

राजे सर टी. माधवराव.

केरळ कोकिळची तृतीय वार्षिक भेट.

# मुलें थोर कशीं करावींत?

ह्या विषयीं

राजे. सर. टी. माधवराव

ह्यांचे विचार.

मूळ इंग्रजी पुस्तकाचें

मराठी भाषांतर.

महाराष्ट्रीय लोकांच्या उपयोगार्थ

केरळ कोकिळचे एडिटर ह्यांनीं केलें,

तें.

देवजी भीमजी ह्यांनीं आपल्या "केरळमित्र"

छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

शके १८११

# भाषंतर कर्त्याची प्रस्तावना.

थोड्या दिवसा पूर्वी इंग्रजी भाषेंत— "Hints on the Trainning of Native children" ह्या नावांचें पुस्तक मद्रासेंत छापून प्रसिद्ध झालें होतें. तें अत्यंत उपयोगी, भारी आवश्य, आणि आपल्यांतील प्रत्येक कुटुंबीयानें संग्रही ठेवण्या सारखें असल्यामुळें त्याचें मराठींत भाषांतर केलें असतां महाराष्ट्रीय लोकांच्या फार उपयोगीं पडेल, अशा विषयीं आमच्या किती एक विद्वान मित्रांकडून सूचना आल्या व आह्मास ही तसेंच वाटल्या वरून हें भाषांतर तयार केलें आहे.

मूळ पुस्तकावर कर्त्याचें नांव स्पष्ट नाहीं. Native thinker—"आपल्या लोकां विषयीं विचार करणारा" असें आहें. परंतु नेटिव्ह थिंकर ह्मणजे राजा, सर. टी माधवराव असें केसरी वगैरे वर्तमान पत्रांतून जग जाहीर झाल्या मुळें आह्मास ही तें खरें नांव आतां प्रसिद्ध कर्ण्यास हरकत वाटली नाहीं. नांव प्रसिद्ध करण्यांतील दुसरा हेतु असा कीं, तेणें करून सदरहू पुस्तकाचें महत्त्व कळून त्याचा लोकांत अधिक प्रसार व्हावा.

तरी ही गोष्ट मनांत आणून राजे साहेब आह्मास क्षमा करतील अशी आहे.

मूळच्या पुस्तकाचें नांव "हिंटस आॅन धि ट्रेनिंग आफ नेटिव्ह चिल्ड्रन" ह्मणजे "स्वदेशीय मुलांच्या शिक्षणा विषयीं सूचना" असें आहे. परंतु ट्रेनिंग ह्या शब्दानें केवळ शिक्षण येवढ्याच अर्थाचा बोध होऊन रहात

नाहीं. तर त्यांत मुलाचें संगोपन करणें, त्यांस वाढविणें इत्यादि अर्थाचा समावेश होतो. व पुस्तकांत ही ह्या सर्व गोष्टींचा विचार केलेला आहे. केवळ शिक्षणाचाच भाग सांगितला आहे असें नाहीं. ह्यास्तव ट्रेनिंग ह्या शद्बा ऐवजी शिक्षण घालून निर्वाह होईल असें वाटेना. ह्मणून "थोर" शद्बाची योजना केली आहे.

"मुलें थोर कशीं करावींत?" ह्मटलें ह्मणजे शरिरानें थोर, आणि मनानें ही थोर अशा दोन्ही अर्थांचा समावेश झाला. ह्यास्तव तेंच नांव दिलें आहे. थोर पुरुषांच्या वाक्याच्या अर्थ ही थोरच असतो. त्या सर्वांचें आकलन माझ्या अल्पमतीस कदाचित झालें नसेल. व त्या मुळें मूळ कृतिला गौणत्व येण्याचा ही संभव आहे. तसें झालें असल्यास सर्वांनीं, व मुख्यत्वें करून राजे साहेबांनीं क्षमा केली पाहिजे. आतां ह्या माझ्या श्रमा पासून महाराष्ट्रीय लोकांस थोडा बहुत तरी उपयोग झाला असे उद्गार जर भाषांतर कर्त्याच्या कानावर येतील, तर तो आपल्या श्रमाचें साफल्य मानीन.

रा. रा. रामचंद्रराव गांवसकर, व्हालकार्ट ब्रादर्सचे हेड क्लार्क, ह्यांनीं हस्तलिखित प्रत एकवार नजरे खालीं घालून बऱ्याच उपयुक्त सूचना केल्या, ह्या बद्दल भाषांतर कर्त्ता त्यांचा फार ऋणी आहे.

भाषांतर कर्त्ता.

# उपोद्धात.

## (मूळ पुस्तक कर्त्यांचा)

माझी तर पक्की समजूत आहे कीं, मुलें सशक्त, उल्हासी, चतुर, आणि चालू पिढीस उपयोगीं अशीं निपजाविण्या साठीं, शिक्षणपद्धतीचे जे मार्ग आहेत, त्यांत स्वदेशाभिमान जागरूक करणारा मार्ग पहिल्या प्रतीचा होय. तसेंच मुलाचें शिक्षण बापाच्या देखरेखे खालीं होणें ही रीत उत्तम. हें लहानसें पुस्तक मीं आपल्या स्वतःच्याच कुटुंबास उपयोगीं पडावें ह्मणून केलें आहे. ह्यांतील मतें पुष्कळ लोकांस पसंत पडण्या सारखीं व स्वीकार करण्या सारखीं आहेत. आणि ह्याचा उपयोग आमच्यांतील आणखी कित्येक कुटुंबास घेतां यावा, ह्मणून थोड्याशा अधिक प्रती छापल्या आहेत.

आणि येणें करून जर स्वदेशबांधवांचें ह्या महत्वाच्या विषयाकडे लक्ष लागून माझ्या श्रमास यश येईल, तर त्या पेक्षां अधिक संतोषाची गोष्ट मला कांहीं नाहीं.

# मुलें थोर कशीं करावींत?

(ह्या विषयीं राजे सर. टी. माधवराव ह्यांचे विचार.)

## मुलांचें संगोपन करतांना मुख्यत्वें कोणकोणत्या गोष्टी ध्यानांत ठेवल्या पाहिजेत?

त्या, त्यांच्या महत्वा प्रमाणें क्रमशः खालीं दाखल केल्या आहेत.

(१) ज्यांच्या योगानें हाता पायास किंवा जिवास धक्का पोचून शरिरास दुखापत होईल, असे अपाय चुकविण्या विषयीं मुलास शिकविणें.

(२) मुलाची प्रकृति सदृढ राखण्या विषयीं तत्पर असणें.

(३) त्याची चौकस बुद्धि हळू हळू आणि वाढवीत वाढवीत प्रगल्भ करणें.

(४) आसोपासच्या वस्तू विषयीं त्याच्या ज्ञानाची अभिवृद्धि करणें.

(५) आई, बाप, व शिक्षक ह्यांच्या आज्ञेस मान देण्याची सवय लावणें.

(६) चांगली चाल, खरी वर्तणूक, आणि उत्तम वळण त्याच्या मनांत भरवून देणें.

(७) एकंदरींत, मूल वयांत आल्यावर आपला संसार उत्तम रीतीनें करील, आणि लोकांशीं सद्वर्तनानें वागून प्रत्येक गोष्टींत यशस्वी होईल असें तयार करणें.

**हितकारक गोष्टी करण्यास परवानगी देणें, किंवा ज्या पासून कोणास उपद्रव नाहीं, त्या गोष्टींस प्रतिबंध न करणें.**

हिकडे तिकडे धावणें, नाचणें, उड्या मारणें, एकामेकांची पाठ शिवणें, इत्यादि गोष्टींकडे मुलांची फार प्रवृत्ति असते. बोलणें, खेळणें, हासणें, गाणें, नक्कल करणें त्यांस आवडतें. कोणी पशू पक्षी ओरडला तर त्याचें तीं अनुकरण करतात. अशा गोष्टी करण्याला आईबापांनीं कधीं हरकत करूंनये. मूल आपल्या करमणूकी साठीं जें जें कांहीं करतें, तें तें त्यास करूं देणें चांगलें; जेणें करून दुसऱ्या कोणास उपद्रव होईल, तें कृत्य करूं लागल्यास मात्र त्यास प्रतिबंध करावा. आपल्या सत्ते वरून मुलाच्या मनांत उत्तम राष्ट्राच्या सत्तेचीं तत्वें काय आहेत तीं प्रतिबिंबित व्हावींत.

प्रसाहिक अपाय— हे वेळच्या वेळीं कसे टाळावेत हें मुलांस लहानपणा पासूनच शिकविलें

पाहिजे. हे अपाय कोणते, ते खालीं लिहिलेल्या थोड्या उदाहरणा वरून लक्षांत येतील.

हिकडे तिकडे भटकून रस्ता चुकणें.

विहिरींत पडणें.

विस्तवानें भाजणें.

उंचा वरून पडणें.

साप, विंचू, गोम, इत्यादिकांच्या नजीक जाणें.

धावत्या गाडी खालीं सांपडणें.

घोड्याचा किंवा बैलाचा धक्का लागणें.

विकारी पदार्थ खाणें.

लहान लहान फळें, बियासकट गिळून जीव बाबरा होणें.

उसाचें कठीण कांडें सोलतांना किंवा कठीण कवचीचीं फळें फोडतांना दांत किंवा तोंड दुखवून घेणें, इत्यादि.

मुलानें आपलें काम स्वतः करावें— मुलाचें स्वतःचें काम त्याच्यानें होण्या सारखें असेल तेवढें दुसऱ्याच्या मदती शिवाय त्याच्या कडूनच करवीत असावें.

उदाहरण—

स्नान करतांना आपलें आपणच पाणी आंगावर ओतावें.

आपलें अंग आपणच चोळावें.

आपलें आपणच पुसून कोरडें करावें

आपलीं भांडीं आपणच घांसावींत.

आपले कपडे आपणच घालावेत.

आपले केंस आपणच विंचरावेत व आपणच बांधावेत.

आपल्या हातानेंच जेवावें.

आपला खेळ आपणच नीट ठेवावा.

एखादी खुर्ची ह्या जागचीं त्या जागीं ठेवणें असेल तर ती आपणच ठेवावी.

त्यांना कांहीं वस्तु पाहिजे असेल, तर ती त्यांची त्यांनीं आणावी.

एखादा खेळ भरून ठेवावयाचा असला, तर तो त्यांनीं स्वतः ठेवावा.

त्यांचीं छत्री त्यांनीं धरावी; मुलाची छत्री गड्या कडून धरविण्याची सवंय वाईट.

मुलांस नेहेमीं आपल्या आईबापांच्या कामांतील काम करूं लागण्याची फार आवड असते; तेव्हां तें त्यांच्यानें होण्या सारखें असेल तेवढें करण्या विषयीं त्यांस मोकळीक द्यावी. कारण, तो ही एक शिक्षणाचाच भाग आहे. मुलांस जें लागेल तें त्यानें स्वतः घ्यावें. चाकरांवर अवलंबून असूंनये, अशी सवंय लावावी.

कारण तें मोठें झाल्या वर जन्मभर चाकर ठेवण्याची कदाचित त्यास ताकद राहणार नाहीं आपल्या लोकांत चालावयास येत असून, व लांब जाणें नसतां ही, मुलास कडेवर घेऊन फिरण्याची चाल आहे. ती वाईट आहे. श्रीमंतांच्या मुलांस सुद्धां त्यांचें काम त्यांनीं करावयास शिकविलें पाहिजे. तें हलकें आहे, किंवा अप्रातिष्ठेचें लक्षण आहे असें कधीं मनांत आणूंनये.

**घोर अन्याय आणि जुलूम** — एखादा बाप अज्ञान बालकास वेळोवेळीं बेदम मारतो, आणि तें ओकसा बोकशी रडूं लागलें ह्मणजे "चप्प्, चप्प्". ह्मणून मोठ्यानें दटावतो. हा किती बरें अन्याय आहे? मुलाला रडें आवरत नाहीं, ह्मणून तें रडत असतें. बाप समजतो हा हट्ट आहे. आणि रागावून आणखी त्यास धोपटतो. आपल्या लोकांतील अशा गोष्टी पुष्कळ वेळ मीं पाहिल्या आहेत, व त्या बद्दल माझ्या मनाला वाईट ही वाटलेलें आहे. तसेंच एखादें मूल एखादे वेळीं बापास दिसणारे नव्हे अशा अंतस्थ दुःखानें किंवा प्रकृतीस बरें नसल्या मुळें ओकसा बोकशी रडूं लागतें. बाप हा हट्ट आहे किंवा द्वाडपणा आहे असें समजून तोंड मिटण्या साठीं त्यास आणखी वरून मारित सुटतो. एखादे वेळीं

मूल एखादा जड पदार्थ आपल्या हातानेंच आपल्या पायावर पाडून घेतें, आणि त्या वेदनेनें रडूं लागतें. बाप येऊन रागारागानें त्यास ओढतो, आणि त्या बद्दल हळहळ करण्याचें, किंवा त्याचें सांत्वन करण्याचें सोडून देऊन उलट त्याच्या अवाडावी बद्दल त्यास मारतो. एखाद्या मुलीचे पोळ्या वगैरे करतांना बोट भाजलें तर आई सुद्धां असेंच करतें. मुलाच्या मनांत कोणता ही विषय भरण्या सारखी त्याची बुद्धि नसतांना, ते जबरीनें शिकण्या बद्दल मारल्याचीं उदारहरणें कांहीं थोडीं नाहींत. तें त्यास समजत नाहीं ह्मणून बाप त्या अज्ञान अर्भकास धोपटींत सुटतो. ह्या आणि असल्याच प्रकारच्या दुसऱ्या गोष्टी निखालस बंद केल्या पाहिजेत.

**गोंदणें** — आमच्या पैकीं पुष्कळ मुली ह्या रानटी चालीचा उपभोग घेतात. परंतु सुशिक्षित बापानें ही चाल मोडण्या सारखी असल्यास मुळीच मोडून टाकावी.

मोडण्या सारखी नसल्यास, तींत कांहीं सुधारणा करण्याचा तरी प्रयत्न करावा. ह्मणजे ठिक-ठिकांणीं तरी गोंदू देऊनये. व त्यांत फार जागा तरी व्यापूं देऊनये. गोंदतांना कोणती आकृति काढावी तें आपणच पसंत करून ती आंखून द्यावी.

विंचू, गोमा, सर्प, अशा सारख्या भयंकर आकृति काढण्यास सक्त मनाई करावी.

पसंत केलेल्या आकृति प्रमाणें पुढें फोड वगैरे येऊन न चरेल अशा बेतानें गोंदावें. काढून दिलेल्या आकृति प्रमाणें गोंदावयास सांप्रत जशा भसाड्या सुया घेतलेल्या **कोराठणींची** योजना करतात, तसें करूंनये. कुशल मनुष्या कडून टोंचवावें. कान नाक वगैरे टोंचतांना ही ह्याच गोष्टी लक्षांत ठेवाव्यात.

हें काम फार दुखावल्या वाचून, नमुन्या बर-हुकूम ज्यास सुरेख करतां येते, अशा कोणत्याही मनुष्यानें केल्यास चांगलें. एखादा शस्त्रवैद्य **कोकाइन** घेऊन हें काम नेहेमीं वहिवाटलेल्या गोंदणाऱ्या बाई पेक्षां उत्तम करील.

अत्यंत **मूर्खपणाची गोष्ट** — ती कोणची? तर लुच्चे लोकांस मोह उत्पन्न करण्या सारखे मुलांच्या आंगावर सोन्या रुप्याचे अलंकार घालणें. मुलें घरांतील मनुष्यांच्या नजरे आड गेल्या वाचून राहत नाहींत. आणि मग आंगावरचे दागिनेच जाऊन राहतात असें नाहीं. तर तीं मुलें प्राणास देखील मुकतात. द्रव्याचीच हानी झाली, तर एक असो. ती कशी तरी सोसवेल. पण मुलाच्या जिवाची— आणि

अपघातानें— हानी होणें, ही स्वाभाविक मृत्यु पेक्षां फार दुःखाची गोष्ट आहे.

तर ह्या अज्ञचाली पासून सावध असा; होतां होईल तो मुलांच्या आंगावर दागिने घालूंच नका. तें ही तुमच्यानें होत नसेल, तर निदान सणा वाराच्या दिवशीं तरी घाला, आणि लागलेच काढून ठेवा. मुलांच्या आंगावर दागिने आहेत तो पर्यंत आईबापांनीं त्यावर चांगली रखवाली ठेवली पाहिजे. सोन्या रुप्याचे दागिने घालण्याचें चुकविण्यास आणखी एक इलाज आहे. तो हा कीं, सोन्या रुप्याचे गिलिट दिलेले दागिने घालावेत. आणि ते तसे हलके आहेत ह्मणून सर्वांस जाहिर करावें. पण ह्या युक्तीनें तरी मुलाचा खास बचाव होईलच असें कांहीं सांगवत नाहीं; कारण गिलिटाच्या दागिन्यासच सोन्या रुप्याचे दागिने समजून लुच्चे लोक मुलाचा खून करण्यास सुद्धां चुकणार नाहींत.

**स्वच्छता आणि आरोग्य**—हीं आईबापांच्या घरांतील वर्तना वरून मुलें उत्तम शिकतात. ज्या घरांत मूल राहतें, त्या घरांत स्वच्छता आणि आरोग्य हीं असावीं तशीं असतील, तर मुलांस हीं तीच सवय लागेल; त्याच्या उलट खपणार नाहीं. मलिनता, आणि दुर्गंधी हींच आजारीपणास आणि मृत्यूस

कारणीभूत होतात हें नेहेमीं मुलास सांगत असावें. आणि त्या प्रमाणें शेजारीपाजारी घडत असलेलीं उदाहरणें दाखवून द्यावींत. घाणीच्या पाण्या पासून अनेक रोग उत्पन्न होतात, हें मुलास वारंवार सांगत असावें. स्वच्छ पाणी कोणतें, घाणेरें पाणी कोणतें, स्वच्छ हवा ह्मणजे काय, खराब हवा ह्मणजे काय ह्याची फोड करून सांगावी. स्वच्छ हवा आणि स्वच्छ पाणी हें आरोग्यास हितकारक आहे, अशा बद्दल मुलाची खात्री करून द्यावी. हीं तत्वें प्रथम पासूनच मनांत बिंबलीं, ह्मणजे थोरपणीं त्यांचा फार उपयोग होतो.

**स्नान**—हा एक साधारण नियम आहे कीं, गार पाण्याचें स्नान फार हितकारक आणि शक्तिवर्धक आहे. थंड पाणी प्रथमतः डोक्यावर ओतावें. आपल्या लोकांमध्यें प्रथमतः आंगावर ओतण्याची चाल आहे, तसें करूंनये. प्रकृतीस बरें नसेल, किंवा शरीरांत अशक्तता असेल, तर कोमट पाण्यानें स्नान करावें. सायंस्नान करण्या पेक्षां प्रातःस्नान करणें उत्तम. उन्हामध्यें, किंवा उघड्यावर, किंवा वाऱ्याच्या झपाट्यांत, स्नान करणें अपायकारक आहे. स्नान करतांना उत्तम साबण आणि जाडा हात रुमाल ह्याचा उपयोग करावा. स्नान होतांच आंग पुसून

कोरडें करावें. हें सर्व एखाद्या खोलींत किंवा अडोसा केलेल्या जागेंत करावें. स्नानास विहिरीचें स्वच्छ पाणी सर्वांत उत्तम. तलावांतील घाण पाण्यानें स्नान केल्यास प्रकृति बिघडते. शरिरांतील सर्व भाग चोळून चोळून स्वच्छ करावेत. मुख्यत्वें करून पाठीचा कणा वगैरे हात पोंचत नसलेले भाग व सांधे, हे चांगले चोळले पाहिजेत. आंग पुसण्यास तुवाल घेणें तो चांगला स्वच्छ धुतलेला व ज्यास दुर्गंधी किंवा मळ नाहीं असा असावा.

**अन्न**—हें तर शास्त्रिय रितीनें सिद्ध झालेलें आहे कीं, पूर्ण वाढलेल्या मनुष्या पेक्षां मुलांस अधिक पौष्टिक अन्न लागतें. नुसत्या भातानेंच निभत नाहीं. अधिक पौष्टिक धान्याचे– ह्मणजे नाचणें, जोंधळें, बाजरी, ह्या पैकीं कांहीं तरी– पदार्थ प्रत्यहीं जेवणांत असावेत. ह्याहून मोलवान असले पाहिजेत असें काहीं नाहीं. त्या बरोबर डाळ, तूप, दूध दही आणि हरकत नसेल तर थोडेसें मांस हीं द्यावें. प्रत्येक दिवशीं जेवणाच्या वेळां तीन नेमाव्यांत, आणि त्या नेमलेल्या वेळीं बरोबर जेवावें. अधिक रुचि येण्यासाठीं पदार्थाचे अनेक प्रकार करीत असावेत. तसेच एकाच पदार्थाचा कंटाळा आला, ह्मणजे दुसरे निरनिराळे करावेत. आपल्या

देशांतील आया, मुला साठीं अनेक प्रकारच्या पोळ्या पक्वान्नें करतात; ती चाल चांगली. मुलांस गोड पदार्थ स्वभावतःच आवडतात. साखरेनें शरीर वृद्धीस सहाय्य व्हावें, ही विधात्याचीच योजना आहे. ह्या करितां असले पदार्थ खुशाल खावयास द्यावेत. परंतु बेता पेक्षां अधिक, किंवा घटके घटकेस देऊन अजीर्ण होईल असें करूंनये. त्याच प्रमाणें फळफळावळ ही पण द्यावी. मुलाची क्षुधा शांत होई इतकें अन्न मुलास द्यावें. मुलांस भूक लागली आणि ते खावयास मागूं लागलें तर त्याची उपेक्षा करूंनये. लागलेंच द्यावें. मुलानें लौकर लौकर किंवा घाई घाईनें खाऊंनये, तर सावकास रमतरमत आणि नीट चावून चावून खावें. मुलानें पुष्कळ खाल्लें ह्मणजे मूल सशक्त असते, अशी आपल्या लोकांतील कित्येक आयांची समजूत असते ती वेडेपणाची होय. मूल मागेल तितकेंच व खाईल तितकेंच त्यास घालावें. जास्त आग्रह करूंनये. माराहाण तर मुळींच करूंनये. एकंदरींत जेणें करून आरोग्यता चांगली राहील त्या मार्गास अनुसरावें.

**दांत**—बहुत करून मुलांचे दांत वाळू, कोळशाची पूड, किंवा अशाच दुसऱ्या एखाद्या खरखरीत पदार्थानें घांसतात; तसें करूंनये. भाताचीं फोलें

आकून केलेली राख दांत घासावयाला चांगली; व करावयाला ही कठीण नाहीं. दांत घांसावयास मऊ केसांची कुंचली चांगली. कांहीं लोक दांतवणांत मीठ मिसळतात. तें ही चांगलें नव्हे असें डाक्टर लोकांचें मत आहे. त्यापेक्षां कापूर घातलेली चुनखडूची भुकणी पुष्कळ अंशानें बरी असें मानतात.

**मुलांचीं वस्त्रप्रावणें** —ह्या बाबतींत उपयोगीं कोणतीं आणि फक्त शोभिवंत व कुसर केलेलीं कोणतीं, त्याचा निश्चय करून त्या पैकीं उपयोगीं असतील तीं पसंत करावींत.

**विणकर**—मुलें कपड्याचा हवा तसा चोळा मोळा करतात आणि फाडतात, ह्यास्तव त्यांस कपडे द्यावयाचे ते चांगले घट्ट आणि टिकाऊ असे द्यावेत.

**रंग**—मुलास कपडे करावयाचे ते अगदीं पांढऱ्या सफेत रंगाचे कधीं करूंनयेत. कारण पांढरीं वस्त्रें लौकर मळतात.

**पोषाख** — मुलगा असो, कीं मुलगी असो. त्यांचें सर्वांग कपड्यानें झाकलेलें असावें हें चांगलें. अगदींच नग्न किंवा अर्धवट पोषाखानें मुलांस बाहेर हिंडूं देणें हें अगदीं गैर आहे.

**शीतोष्णा पासून संरक्षण**—मुलांचे कपडे थंडी किंवा ऊन्ह ह्या पासून शरिरास बाधा न होईल असे

असले पाहिजेत. उन्हाळ्यांत घालण्याचे कपडे, आणि हिवाळ्यांत घालण्याचे कपडे, निरानिराळे करून ठेवावेत. कपडा असा असावा, कीं थंडीचें तर रक्षण व्हावें आणि आंगांत कंटाळवाणा उबारा तर येऊंनये, ज्यांत अत्यंत महत्वाचीं इंद्रिययंत्रें सांठविलेलीं आहेत. असें जें धड, त्याच थंडी पासून सर्वापेक्षां अधिक संरक्षण करावें लागतें.

**स्वच्छता** — कपडे अगदीं स्वच्छ राहवेत ह्या साठीं ते वारंवार धुतले पाहिजेत. त्यास कोणत्या ही प्रकारचा दुर्गंध असूंनये.

**सौख्य** — मुलास कपडे करणें तें मुख्यत्वें करून त्यांचे हात पाय इत्यादि भाग त्यास सहज रीतीनें हालवितां येतील इतके ढिले असावेत. कापडाच्या योगानें मुलाच्या नेहेमींच्या चपलत्वांत अडथळा होऊंनये. कोणताही कपडा इतका अवळ असूंनये कीं, ज्याच्या योगानें रक्ताभिसरणास किंवा पोटांतील अथवा छातींतील स्वभाविक गतीस अडथळा होईल. आंगास करकोचे पडतील इतके घट्ट कपडे कधीं असूंनयेत. असे करकोचे मुलांच्या आणि मुलींच्या कमरेस पडलेले नेहेमीं दृष्टोत्पत्तीस येतात. ह्याचें कारण परकर किंवा धोतर इतकें घट्ट आवळलेलें असतें हें होय. मुलीस चोळी घालतात, ती सुद्धा नेहेमीं

इतकी घट्ट असते, कीं त्या योगें छाती चिंचोळी हाऊन आंतील हृदय चलनास अडथळा होतो, आणि त्या पासून मुलगी कधीं कधीं अजारी देखील पडते.

**आंथरूण** — ह्यांत देखील वर सांगितलेल्या (स्वच्छपणाच्या) तजवीजी लक्षांत ठेवाव्यात. हांतरा-पांधरावयाचीं चिरगुटें दिवसा केवळ वळकटीच करून ठेवूंनयेत. तर त्यांतील दुर्गंधी वगैरे निघून जावी ह्मणून तीं उघड्यावर पसरावींत. निजतांना मुलाच्या तोंडावर पांघरूण घालणें हें अगदीं गैर आहे, कारण त्या पासून श्वासोच्छ्वास बाहेर जाण्यास प्रतिबंध होतो.

**हातरुमाल** — नाक, तोंड वगैरे पुसतां येईल असा एक हातरुमाल मुलापाशीं दिलेला असावा. कोणी कोणी मोठ्या धोतरानें किंवा लुगड्यानें किंवा त्याच्या शेवटानें पुसतात, ती चाल घाणेरी आहे. ती अगदीं बंद करावी. लग्नकार्य, उत्सव, सणवार अशा प्रसंगीं घेण्या साठीं रोजचा पेक्षां चांगले हात रुमाल ठेवावेत. ह्याच्या योगानें मुलाच्या स्वतःच्या जिवाला, आईबापाला, मित्रांला, आणि सोयऱ्या धायऱ्यांना ही आनंद होतो. ह्या ठेवणीच्या कपड्यानें भूषणच्या भूषण होतें, आणि मुलाची हौस पुरते.

**केंस** — मुलांचे केंस नेहेमीं ताणून बांधतात. तसें बांधूं नयेत. तसेंच केस विंचरावयास तीक्ष्ण दातांची फणी ही घेऊं नये.

**व्यायाम** — ह्या संबंधांत कांहीं गोष्टी फार महत्त्वाच्या आहेत:—

मुलाच्या प्रकृतीस व्यायामाची फार आवश्यकता आहे.

मनोल्हासानें होईल तो चांगला.

ज्यांत त्याचा संतोष होईल तो चागला.

सहजवृत्त्या होईल तो चांगला.

नुसती कसरतच कांहीं इतकी चांगली नाहीं. व्यायाम करणें तो उघड्या हवेंत करावा. घरांत च करावा असें नाहीं. हवा असावी ती स्वच्छ उघड्या मैदानांतील किंवा समुद्र काठची असावी.

थकें पर्यंत व्यायाम करूं नये. व्यायाम करून आल्यावर लागलेंच मुलांस स्नान किंवा जेवण घालूं नये. व्यायाम मुलाला जसा आवश्य आहे, तसाच मुलीला ही पण आहे. परंतु ह्या गोष्टीकडे आपले लोक द्यावें तितकें लक्ष देत नाहींत. ज्या मुली लहानपणीं व्यायाम करतात, त्या चांगल्या सजबूत व निरोगी होतात; आणि त्यांची प्रसूती पासून लौकर सुटका होते. आणि उलटपक्षीं ज्या मुलींच व्यायाम करीत

नाहींत, किंवा फार थोडा करतात, त्या फार अशक्त, नाजूक, अशा होऊन प्रसूती पासून सुटका होते वेळीं त्यांचे फार हाल होतात किंवा त्यांच्या वर भयंकर प्रसंग गुदरतो. उपजत बुद्धीनें खेळकर होऊन मुलें अपला आपणच व्यायाम करून घेतात. त्यांच्या आरोग्या साठीं, आणि वृद्धि साठीं विधात्यानेंच ही योजना करून ठेविलेली आहे. त्यांच्या चपळाईला प्रतिबंध करणें हें गैर आहे. उलट त्याला आपण फिरायला उत्तेजन दिलें पाहिजे. मुलींना व मुलांना व्यायाम होण्या जोगे बाहेरचे खेळ आपल्या मध्यें पुष्कळ आहेत.

ते जुने आणि अडदांडपणाचे आहेत असें समजून त्यांचा अव्हेर करूंनये. ते फार चांगले आहेत; त्यांच्या योगानें मुलांस व्यायाम व करमणूक होते. येवढ्या मनुष्य वस्तींत ते पूर्वींचे खेळ मोडून त्यांच्या मोबदला नवे खेळ शोधून काढणें हें कांहीं सोपें काम नाहीं.

**झोंप** — नऊ किंवा दहा तास मुलाला झोंप पाहिजे. त्यांत कमी करूंनये. जेवणा पूर्वीं मूल निजून पडणें, आणि मग त्यास एकदम जाऊन दांडगेपणानें आणि जोरानें उठवून त्याला जेवावयाचा आग्रह करणें हें गैर. आईबाप, दाई, किंवा चाकर, ह्यांस चिकटून मुलाला निजवूं नये. रात्रीं-

तून एक वेळ त्यांना आंथरुणा वरून लघ्वीस उठवावें त.

**लक्ष लावून हस्तकौशल्याचें काम करणें—** कलाकौशल्याचीं पुष्कळ कामें हातानें करण्या सारखीं असतात. ह्या करितां मुलें आपल्याच आवडीनें ज्या धंद्यांत मन घालतील, तोच त्यांस खुशालणें करण्यास परवानगी द्यावी. आणि त्यांच्या हस्तकौशल्यांत जेणें करून सुधारणा होईल तें करावें. तेणें करून हाताचें कौशल्य आणि चपळपणा वाढतो. उदारणार्थ– गोट्या खेळणें, पेनसिल किंवा लेखणी करणें, चिखलाचीं किंवा मेणाचीं बाहुलीं करणें, सुईनें शिवणें, कात्रीनें जाळी कातरणें, चित्रें काढणें, रेघा मारणें, लिहिणें, भाजीपाला किंवा फळफळावळ चिरणें, चिकण मातीचीं चित्रें करणें, रांगोळी घालणें, हस्तकौशल्य वाढेल अशा तऱ्हेचे आपल्या लोकांतील माळा, हार, वगैरे गुंफावयास लावणें इत्यादि.

**शरीर आणि मन —** खालील तत्वें उत्तम प्रकारें सिद्ध झालेलीं आहेत. शरीर आणि मन ह्यांचें निकट सान्निध्य आहे. दोहींचें ही महत्व सारखेंच आहे. ह्यास्तव त्या दोहोंवर ही सारखें लक्ष्य पुरविलें पाहिजे. दोघांस ही सारखेंच वाढविलें पाहिजे. शरीरालाच फार वाढवूं लागले, तर मन क्षीण होईल. तसेंच मनाला फार वाढविलें तर शरीर

क्षीण होईल. आपल्या लोकांत मनाच्या वृद्धि कडे विशेष लक्ष आहे. मुख्य उद्देश हा, कीं शरीर आणि मन होन्हीं ही निकोप असावींत. ह्या दोन्ही पैकीं देखील पहिल्या कडे- ह्मणजे शरिरा कडे- विशेष लक्ष दिलें पाहिजे. पुष्कळ शिकलेला असून शरीर क्षीण असणाऱ्या पेक्षां, सामान्य अक्कल असून शरीरानें सदृढ असणारास सुख अधिक असतें. महत्वाकांक्षी बाप असला ह्मणजे नेहेमीं अल्पवयांतच मुलावर मानासिक श्रमाचा भार लादून मनाला विकासित करण्याची जबरी करतो.

हीं मोठीच चूक आहे, नव्हे मूर्खपणा आहे. कारण त्या मुळें मुलाचें शरीर अगदीं क्षीण होऊन जातें.

मनाला आणि तशीच शरीराला वाढावयाला, एक प्रकारची स्वाभाविक मर्यादा असते. त्या स्वाभाविक मर्यादेला सहाय्य करण्याचा बापाचा उद्देश असावा. तिच्या वर बलात्कार करूंनये किंवा अयोग्य वेळींच तिला चेतवूं नये.

शक्तीच्या बाहेर अभ्यास करण्याकडे जर मुलाचा कल असला, तर त्याला उत्तेजन देण्यापेक्षां थोडासा प्रतिबंधच करावा. एखादा मुलगा जर स्वाभाविकपणें म्याट्रिक्युलेशनची परिक्षा तेराव्या वर्षीं पास होणार असेल, तर अकराव्या वर्षींच पास हो ह्मणून त्याच्या पाठी मागें लकडा लावूं नये.

मुख्य हें तत्त्व ध्यानांत ठेवले पाहिजे कीं मुलाच्या शरीरास धक्का पोंचेल असे श्रम त्याच्या मेंदूस न व्हावेत.

**स्नायू अथवा मन** — ह्या पैकीं मुलाच्या कोणत्या भागाकडे अधिक लक्ष पुरविलें पाहिजे, व पुढें मुलाला जन्मभर पर्यंत कोणतें अधिक उपयोगीं पडेल, हें बापानें निश्चय करून ठरविलें पाहिजे. उदाहरणार्थ— लोहाराच्या धंद्यांत स्नायू अधिक उपयोगी पडतील, आणि सोनाराच्या धंद्यांत मन अधिक उपयोगीं पडेल. कारकुना पेक्षां शेतकऱ्यास स्नायूची गरज अधिक असते. मजूरदारा पेक्षां पंडितास स्नायूची गरज कमी. विद्यार्थ्या पेक्षा योद्ध्यास स्नायूची गरज फार. हें ध्यानांत ठेवावें कीं साधारणपणें सर्व देशांत,— मुख्यत्वें करून आपल्या हिंदुस्थानांत— मानसिक श्रमा पेक्षां शारीर श्रमाची अपेक्षा फार आहे. आणि दुसरे पहिल्या पेक्षां उपजिविकेला ही अधिक साधनभूत होतात.

**औषध** — आपलीं मुलें घट्टाकट्टा असावींत ह्या दृढतर इच्छेनें आपल्यांतील कितीएक आईबाप मुलांस मनस्वीं औषधें देतात. औषध देणें तें जरूर लागे तेव्हांच द्यावें. स्वाभाविकपणें मुलांस औषधाची गरज नाहीं. कारण पशू पक्ष्यांचीं पिलें कांहीं

एक औषध दिल्या वांचून वाढतात हें आपण पहातों. मुलानें औषध घेत नाहीं ह्मटलें, तर आपल्यांतील आईबापें जबरीनें त्याच्या घशांत ओततात. हें अगदीं गैर आहे. दुसऱ्या कांहीं वर सांगितलेल्या योग्य रीतीनें मुलावर छाप बसविण्याची कला जर आईबापानीं साध्य केली असेल तर तीं बापानें औषध घे ह्मणतांच घेतील. लहानपणींच देवी काढविल्या ह्मणजे मुलाचा मोठा बचाव होतो. ह्या करीतां काढवतील तितक्या लौकर मुलाच्या देवी काढवाव्यात. आपल्या लोकांतील आईबाप नेहेमीं ह्या गोष्टीची चाल ढकल करून दिवस ढकलतात, आणि तेणें करून पुष्कळ मुलें जाया होतात. डोळ्याच्या आजारानें मुलें नेहेमीं हैराण असतात. कोणत्याही दवाखान्यांत जावें ह्मणजे त्याला अगदीं सोपा उपाय करतात. आणि तेणें करून मूल तेव्हांच दुःखमुक्त होतें. आपले लोक त्यास खरे उपाय करण्याचे सोडून देऊन ढोंगीं वैद्याचें औषध देतात, आणि अशा उपायांच्या योगानें प्रियलें कराच्या डोळ्यास थोडी बहुत किंवा कधीं कधीं जन्माचीच इजा होते. आईबापांनीं नेहमीं हें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, सर्व अवयवांत डोळा हा अत्यंत श्रेष्ठ आहे. त्याची उपेक्षा करतां कामानये.

## बापाची मुलाविशीं कळकळ.

बापानें नेहमीं मुला विषयीं कळवळा बाळगला पाहिजे. मुलाला आवडणाऱ्या वस्तु देण्यांत बापाला आनंद असावा. ह्मणजे मुलाला दुप्पट मौज वाटते. मुलाला ज्या ज्या गोष्टींनीं आनंद होईल त्या गोष्टी आपण सुद्धां त्यांस करूं लागाव्यात.

जर एखादें मूल आपला खेळ नीट मांडून पहायास हाक मारील, तर बापानें नाहीं ह्मणूनये येवढेंच नव्हे, तर मोठ्या आनंदानें जाऊन पाहवा आणि आपली खुषी दर्शवावी. आपल्या लोकांचीं मुलें केव्हां केव्हां कळकाच्या कांबींचें किंवा केळीच्या सोपटाचें घरकूल करीत असतात, त्यास बापानें लागेल ते जरूरींचें सामान पुरवावें. जर तें सुशोभित करण्यास मुलांस फुलें वगैरें पाहिजे असलीं, तर बापानें तीं आणून देऊन त्यांचे मुलास हार करावयास साह्य करावें. व ते त्यास नीट नेटके कसे घालावेत हें दाखवून द्यावें. मूल कांहीं खावयास वगैरे घेऊन खेळत असतांना बापास त्यानें जेवावयास हाक मारिली, तर आपण लगेच आनंदानें जाऊन जेवलें पाहिजे.

मूल जर एखादी लहानशी खेळावायची होडी घेऊन, ती पाण्यांत खेळवूं पहात असेल, तर बापानें त्यास सहाय्य करावें. आपण लगेच जाऊन त्यांत बसाव-

याला एक बाहुलें करून देऊन त्याच्या दोन्ही हातांत दोन चिमुकलीं वल्हीं द्यावींत ह्मणजे मुलास अधिकच आनंद होईल.

अशा अनेक प्रकारांनीं मुलांत मिसळून त्यास सहाय्य करून त्याची हौस पुरवित असावें. असें केलें ह्मणजे मुलास बापाचा लळा अधिक लागेल, आणि त्याच्या आज्ञेला तीं अधिक तत्पर रहातील. तसेंच मुलाला कांहीं अडचण आली किंवा दुःख झालें, तर बापाचें मन कळवळलें पाहिजे. त्यास शिक्षा करतांना देखील बापानें दुःख आणि कळवळा असा दाखविला पाहिजे, कीं मुलास देखील वाटावें कीं, बापाला शिक्षा करण्याचा कंटाळा आहे, परंतु नाइलाजास्तव ती त्यास करणें भाग पडतें. कांहीं बाप मुलास अशा रीतीनें वागवितात, कीं ते बाहेर गेले ह्मणजे मुलास आनंद होतो. हें गैर आहे. तो त्यास जर यथायोग्य रीतीनें वागवील, तर तो घरीं असतांच त्यास अधिक आनंद वाटेल. एकंदरींत, मुलास असें वाटावें कीं बाप हा सुख देणारा आहे. दुःख देणारा नव्हे.

**बापाचा कित्ता** —हें एक ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, मुलें पाहिलेली गोष्ट करण्या विषयीं सदा सार्वकाल तयार असतात. बापाचें वळण चांगलें असेल, तर तें त्याच्या उपदेशा पेक्षां ही मुलास

उत्तम शिक्षण होतें.. बाप जर वटके घटकेस रागावेल, तर मुलें तो कित्ता तेव्हांच उचलतील. बाप जर उद्धट असेल, तर मुलें ही लौकरच तशीं होतील. ह्या करितां मुलानें पुढें कोणत्या तऱ्हेनें वागावें असें वाटत असेल त्या रीतीनें बापानें आपलें वर्तन ठेवलें पाहिजे. ज्या गोष्टी मुलानें पुढें करूंनये असें वाटत असेल, त्या गोष्टी मुलाच्या देखत बापानें न करण्या विषयीं फार जपलें पाहिजे. हा साधारण नियम मुख्यत्वें करून कुटुंबांतील प्रत्येक मनुष्यानें ध्यानांत ठेवला पाहिजे. ह्या वरून उघडच आहे कीं, मुलास दुःसंगती पासून नेहेमीं दूर ठेवावें.

**मुलाचे चांगले आणि वाईट गुण**—मुलामध्यें चांगलें गुण कोणते, आणि कोणत्या गुणास उत्तेजन द्यावें? मुलामध्यें वाईट गुण कोणते आणि कोणत्या गुणास तेथल्या तेथें दाबून टाकलें पाहिजे?

ह्याचें उत्तर अगदीं उघड आहे. जगामध्यें लोक ज्या गुणास दोष लावतात ते गुण वाईट. बापानें मुलास प्रथमतः आपल्या आईबापाची, भावा बहिणींची, घरांतील सर्व माणसांची, आणि चाकरनो-करांची सुद्धां ममता, मान, पूज्यबुद्धि संपादन करावयाला शिकवावें. तदनंतर शेजाऱ्याची; आणि

मग इतर लोकांची हीं संपादावयास शिकवावें. मुख्यत्वें करून सत्य आणि प्रामाणिकपणा ह्या श्रेष्ट गुणाचें महत्व मुलांच्या मनांत बिंबविण्या कडे विशेष लक्ष पुरविलें पाहिजे. चांगल्या रितीभातींचें महत्व शिकविण्या कडे दुर्लक्ष करूंनये.

**गडी माणसें**—कुटुंबांतील हलके सलके चाकर मुलास कांहीं वाईट गोष्टीचा कित्ता घालून देतील किंवा वाईट कृत्यें शिकवितील ह्या विषयीं फार जपावें मोठ्या कुलीन घराण्यांतील मुलास चाकरा कडून वाईट सवयीं लागलेलीं अनेक उदाहरणें मला माहित आहेत.

आवडतें अन्न शरिराचें चांगलें पोषण करितें. आणि आवडतें ज्ञान मनाचें चांगलें पोषण करितें. हीं महत्वाचीं आणि सिद्ध झालेलीं प्रमाणें ध्यानांत आणून त्या प्रमाणें वर्तणूक ठेवावी.

मुलांस आवडतें अन्न कसें करावें, हें आपल्या लोकांस चांगलें माहित आहे. पण त्यास आवडतें ज्ञान कसें करावें ते त्यास इतकें कळत नाहीं. ह्या दुसऱ्या गोष्टी विषयीं खालीं लिहिलेल्या सूचना आहेत,

प्रत्येक मुलाला सृष्टिजन्य पदार्थाचा चमत्कार वाटत असतो. आणि जो जो पदार्थ त्याच्या दृष्टी पुढें येतो, तो तो जाणण्या विषयीं त्याची स्वतः सिद्ध प्रवृत्ति असते. तें आपली बुद्धि सभोंवतलाच्या

पदार्थांकडे लावतें, आणि त्याचें ज्ञान त्यास झालें म्हणजे त्यास आनंद होतो. तें त्यास पहातें; त्याला हात लावतें; त्यास हालवून पहातें; त्याची चव घेतें; हुंगतें; आणि त्यास कान लावतें. अशा क्रमानें मूल एका मागून एका पदार्थाची माहिती करून घेतें. ह्या प्रमाणें एखाद्या चमत्कारिक पदार्थांची चांगली माहिती करून घेई पर्यंत मुलांस मौज वाटतें; पुढें त्याच्या कडे ते पहात सुद्धां नाहीं. मग त्यास नवे नवे पदार्थ पहाण्याची इच्छा होते.

ह्या वरून उघड आहे कीं, मुलांचें ज्ञान वृद्धिंगत होण्या साठीं बापानें क्रमाक्रमानें नवे नवे पदार्थ मुलाच्या दृष्टी समोर आणले पाहिजेत. जुने आणि नेहेमीं पाहण्यांतले पदार्थ सुद्धां कांहीं एका तऱ्हेनें जुळून दिलें, किंवा निराळा आकार करून दिला, किंवा त्याचा कांहीं चमत्कारिक संबंध लावून दिला, तर मुलास प्रिय होतील. उदाहरणार्थ —एक कळकाची काठी घेतली, तर तींत कांहीं त्यास आश्चर्य वाटणार नाहीं. पण तेंच त्या काठ्या तीन घेऊन त्याचें एक तिकाटणें करा. आणि त्यावर त्याची खेळावयाची पेटी ठेवा. कीं लागलीच त्यास मौज वाटावयाला लागेल. व तें लागलेच त्या सारखें दुसरें

तिकाटणें करूं लागेल. तसेंच चौकोनी गंजिफा मुलाच्या नेहेमीं पहाण्यांत असतात, ह्या मुळें त्यांचें त्यास फारसें आश्चर्य वाटत नाहीं. पण तेंच त्यांचें एक घरकूल बांधून द्या; ह्मणजे मुलास आनंद होईल. आणि तें लागलीच दुसऱ्या गंजिफा घेऊन त्यांचें स्वतः घरकूल बांधूं लागेल. तसेंच, धातूच्या तारांचें गुंडाळें पाहून कांहीं त्यास इतकी मजा वाटणार नाहीं, पण तीच तार एखाद्या लांकडाच्या तुकड्यास बांधून ती वाजवून दाखवावी ह्मणजे झालें. अशा प्रकारचीं अनेक उदाहरणें मुलाच्या मनांत भरवून दिलीं, ह्मणजे त्यास आश्चर्य वाटून त्यांचें लक्ष अधिक चौकस होतें. खिडकीचें भिंग घेतलें, तर त्यानें कांहीं मनाला आनंद होत नाहीं. परंतु तेंच दिव्या वर धरून त्याजवर काजळ धरावें आणि त्यांतून मुलास पहा ह्मणावें ह्मणजे तें चकित होईल. मुलास निरनिराळ्या रंगाचे कांचेचे तुकडे द्यावेत आणि त्यांतून पहावयास सांगावें ह्मणजे त्यास नवीन टूम दृष्टीस पडेल.

एक जास्विनीचें फूल घेतलें, तर तें मुलांस इतकें मनोरंजक वाटणार नाहीं. पण तेंच कागदावर चुरडावें, आणि त्यावर लिंबाच्या रसानें थोडेंसें लिहून, अक्षर लागलीच कसें तांबडें लाल होतें तें

मुलास दाखवावें. ह्मणजे त्यास मोठा चमत्कार वाटेल. एक पिंपरणीचें पान घेऊन तें सारखें गुंडाळावें. आणि त्याची पिपाणी करून ती मुलास वाजवून दाखवावी. कीं लगेच ती तुमच्या हातांतून मूल ओढून घेईल आणि त्याच मासल्याची दुसरी पिपाणी करावयास लागेल. एक नारळीची पोय दाखवावी. पहावयाला गेलें तर हा क्षुल्लक पदार्थ आहे. त्याची होडी करून ती पाण्यांत सोडावी. ह्मणजे मुलाला पुष्कळ आश्चर्य वाटेल. त्याच प्रमाणें केरांत पडलेलें एक जुनें वर्तमानपत्र घेऊन दाखविलें तर तें त्यास आवडणार नाहीं, पण त्याचा पतंग करून तो सोडावा ह्मणजे मुलास परमानंद वाटेल. नारळाची करटी यः कश्चित पदार्थ आहे. पण तिच्या बुडास एक बारिक भोंक पाडून ती पाण्यांत सोडावी. त्यांत आलेली पाण्याची धार पाहून, व ती एकाएकीं बुडून तळाशीं गेलेली पाहून मुलें खुष होतील. शेवटच्या प्रयोगांत आणखी पालट करावा. करटीच्या ऐवजीं तांब्याचें भगुणें करावें आणि त्यास असें बेतानें छिद्र पाडावें, कीं तें पात्र बरोबर पांच मिनिटानें तळाशीं जाईल. मग सांगावें कीं हें एक वेळाचें माप आहे. हें पात्र जर ह्या प्रमाणें बारा वेळ बुडालें तर सारा मिळून एक तासाचा वेळ होईल.

मुलाला एक वाळूचें घड्याळ दाखवावें आणि सांगावें, कीं हें एक दुसऱ्या प्रकारचें वेळाचें माप आहे. कांचेचा पेला, ही तर सर्व साधारण वस्तु आहे. आपलीं बोटें ओलीं करून त्याच्या काठा वरून चोळावींत. ह्मणजे एक निराळाच आवाज उत्पन्न होईल. आणि तेथें असणाऱ्या मुलांस गम्मत वाटेल. एक हवेची*उशी दाखवावी, आणि समजून सांगावें, कीं हवा ही स्पर्शनीय आणि लवचिक आहे. एक कांचेचा ग्लास घ्यावा. आणि त्याच्या बुडाशीं आंतल्या बाजूनें एक कापडाचा कोरडा तुकडा डसवावा. नंतर तो पालथा करून एका पाण्यानें भरलेल्या भांड्यांत जोरानें बुडवावा आणि दाखवावें कीं पाणी बुडा पर्यंत चढत

---


*एक प्रकाची रबराची उशी व गादी मिळते. ती एकसंद पिशवी सारखी असून तीस एका बाजूस एक लहान छिद्र ठेवून तेथें मळसूत्र केलेलें असतें. आपणास निजावयाचें असेल, तेव्हां त्या भोंकांस तोंड लावून फुंकावें ह्मणजे आंत वारा भरतो. वायू भरला कीं लगेच स्क्रू घट्ट बसवावा ह्मणजे मऊ उशी होते. निजून उठले ह्मणजे स्क्रू काढून तोंड खुलें करावें ह्मणजे वारा निघून जातो. व मग ती पिशवी घडी करून खिशांत सुद्धां घालतां येते. ह्या हवेच्या गादी उशीचा उपयोग प्रवासांत फार होतो.

नाहीं व कापडाचा तुकडा भिजत नाहीं. ह्याच साधनानें बुडण्याच्या घांटेची युक्ति समजून द्यावी.

तसेंच एका बाटलींत पाणी आणि लहान **सायफानें** घालून दाखवून ही मुलास रिझवितां येईल. एका पाण्यानें भरलेल्या पात्रांत एक कापराचा तुकडा तरंगत ठेवा आणि तो पेटवा. आणि तो जळूं लागला ह्मणजे त्यावर एक पाण्या पर्यंत ग्लास उपडे ठेऊन त्यांची हवा बंद करा. आणि मग ज्योत कशी विझते तें दाखवा. आणि समजून सांगा कीं, दहन क्रियेला वायू हा अवश्य आहे. कंदिल-वाल्या कडे जाऊन एक किंवा दोन फूट लांबीची जस्ताची एक आडवी नळी करवावी. आणि तिच्या दोन्ही शेवटास खाली दिलेल्या आकृती प्रमाणें एक आंखूड व एक लांब नळी बसवावी. ह्यास काय! फार तर आणा, किंवा दोन आणे पडतील.

---

१सायफान ह्मणोन कांचेची वाकडी नळी असते. तिचें एक टोंक आंखूड असते, व एक टोंक लांब असतें. लांब टोंक पाण्यानें भरलेल्या बाटलींत बुडवावें आणि बाहेर असणाऱ्या आखूड टोंकास तोंड लावून त्यांतील वायू काढून घ्यावा. ह्मणजे त्यांतून पाण्याची धार पडूं लागते. व ती बाटलींतील सर्व पाणी संपे पर्यंत थांबत नाही.



हें मुलास दाखवावें. आणि उभ्या पैकीं उंच नळींत पाणी ओतावें ह्मणजे धाकट्या नळीनें कारंजें उडूं लागतें. आणि मुलास मोठी कर्मणूक होते. त्या कारंजाच्या धारेच्या तोंडावर बारीक बारीक गोळ्या किंवा बिया ठेवाव्यात. ह्मणजे त्या खालवर नाचूं लागतात. आणि मुलांना मौज वाटतें. हाच प्रयोग त्या जिनसा बदलून बदलून केला, तर त्यांस जास्त जास्त उत्सुकता वाटून कित्येक दिवस पर्यंत कर्मणूक होते.

ह्या योगानें पाणी आपल्या समपातळी पर्यंत कसें चढतें तें मुलांस सहज अभ्यासानें समजेल. मग उभ्या नळ्यांचीं तोंडें वर राखून तोंडा पर्यंत सर्व नळ्या जमिनींत पुराव्यात. ह्मणजे तर मुलास फारच मौज वाटेल. ह्याच रीतीनें नळानें शहरांत पाण्याचा पुरवठा करतात, अशी मलाची समजूत घालावी.

**पायरीनें पायरी गांठावी** — मुलानें चढावयाचें झालें, तर एका पायरी वरून दुसऱ्या पायरी वर गेले पाहिजे. किंवा चालायाचें झालें, तर एका पावला मागून दुसरें पाऊल टाकलें पाहिजे, हें उघड आहे. व तें प्रत्येक मनुष्य कबूल करील. मग हें ही उघड नाहीं काय? कीं ज्ञान मिळविणें सुद्धां पायरी पायरीनेंच मिळवून त्याची वृद्धि केली पाहिजे. तर हेंच तत्व ध्यानांत ठेवून त्या प्रमाणें मुलास त्याची बुद्धि उदयास आणलें पाहिजे.

समजा; कीं तुमच्या मनांत मातीचीं भांडीं कशीं करतात तें मुलास समजून सांगावयाचें आहे, तर त्यास प्रथम मातीचा ढीग दाखवावा. मग त्यांत पाणी कसें घालतात, आणि त्याचे गोळे कसे बनवितात तें दाखवावें. नंतर एक एक गोळा घेऊन तो कुंभाराच्या चाकावर कसा ठेवतात, आणि चक्र जोरानें फिरूंलागे पर्यंत हातानें त्यास कसा आकार देतात तें दाखवावें. नंतर मडकें तयार झालें ह्मणजे चाकावरून कसें काढतात तें दाखवावें. नंतर तीं उन्हांत सुकवून कठीण कशी करतात तें दाखवावें. अशी क्रमाक्रमानें समजुत पाडली ह्मणजे मुलास सहज रितीनें संपूर्ण वस्तूची माहिती होते.

कापड कसें तयार करतात हें मुलास समजून सांगावयाचें असल्यास ह्याच पद्धतीनें सांगावें. मुलांस कापसाच्या झाडा पाशीं न्यावें. आणि बोंडांतील कापूस काढून द्यावा. आणि मग त्यांतील सरक्या कशा काढाव्यांत हें दाखवावें. नंतर पिंजलेल्या कापसा पासून सूत कसें काढतात तें दाखावावें. नंतर सर्व दोरे एकत्र करून पांजण कशी करतात तें दाखवावें. ह्या प्रमाणें कापड होई पर्यंत सर्व कृति त्यास दाखवावी. इतकीं उदारणें ध्यानांत येण्यास पुरे आहेत. कोणती ही माहिती क्रमा क्रमानें सांगितली पाहिजे, हें तत्व लक्षांत ठेवलें पाहिजे. पूर्वीचा एक ही सिद्धांत शिकविल्या शिवाय युक्लिडचा सत्तेचाळिसावा सिद्धांत मुलास शिकविण्याचा प्रयत्न करूं लागलात तर तो सिद्धिस जाईल काय? खचित जाणार नाहीं. तर नेहेमीं पायरी पायरीनें शिकविलें पाहिजे.व पुढें सांगतांना मागें सांगितलेलें मनांत बरोबर ठसलें किंवा नाहीं, हें ही नीट पाहिलें पाहिजे.

**मुलामध्यें आनंदी स्वभावाचें बीजारोपण करावें** — आनंदित स्वभाव हा आयुष्याच्या कोण त्याही स्थितींत सुखदायकच आहे. ह्या करितां तो मुलामध्यें आवश्य बिंबवून द्यावा. तुमची स्वतःचीच मुद्रा जर प्रसन्न असली, तर तुह्माकडे मूल येईल तें ही

आनंदानें व हासत मुखच येईल. आणि तेणें करून मुलामध्यें उल्हासीपणा चांगला प्रतिबिंबित होईल. मुलाशीं नेहेमीं उल्हास वृत्तीनें बोलावें. तापूं नये. मुलाचें मन नेहेमीं प्रसन्न राखावें. थोड्यांत आणि होण्या सारख्या गोष्टी साठीं मुलाचो मर्जी बिघडूं नये. ह्या जरी महत्वाचा गोष्टी आहेत, तरी ध्यानांत ठेवून सवई आणि अभ्यास केल्यास फार कठिण नाहींत.

**बळजोरी पेक्षां समजूत चांगली**–हें तत्व नेहेमीं मुलास शिक्षण देतांना बापानें लक्षांत बाळगलें पाहिजे.

**गोष्टी सांगणें** — लहान लहान गोष्टीं वर मुलांची फार भक्ति असते. आईने किंवा बापानें मुलास बक्षिसा दाखल एक गोष्ट सांगावी. त्या गोष्टी पासून त्याच्या मनास केवळ आनंदच होऊन राहूंनये. तर उपयुक्त माहिती ही व्हावी. मुलास गोष्ट सांगणें ती थोडक्यांत आणि सोप्या भाषेंत सांगावी. तींतील मतलब मुलास लागू असावा, थोरास लागू असूंनये. ती स्वाभाविक असून बालमंडळीस मनोरंजक व्हावी. ती निवळ रचित दिसण्या पेक्षां तींत घडण्याच्या गोष्टींचें कांहींसें सादृश्य असावें.

आपल्या लोकांतील गोष्टी नेहेमीं असंभवनीय आणि खोटसाळ असतात. कारण त्यांतील कथानकें अगदींच असाधारण आणि खोटीं असतात. देव,

समंध, भुतें, असंभाव्य गोष्टी, ज्या कधीं दृष्टीस सुद्धां पडावयाच्या नाहींत अशाचें वर्णन मुलाच्या गोष्टींत न आणण्या विषयीं सावधगिरी ठेवावी.

हें लक्षांत ठेवावें, कीं एखाद्या तसबिरीनें जसा सृष्टींतील पदार्थ खरोखर डोळ्या पुढें उभा राहतो, तसें गोष्टीच्या योगानें जन्मांतील वृत्त पुढें उभें रहावें. शहाण्याबापानें मनोरंजक आणि बोधपर अशा गोष्टी शिकून ठेवाव्यात. उत्तमांत गणण्या सारखीं जीं थोडिशीं दुर्लभ पुस्तकें आहेत, त्यांतून त्या काढावयास मिळतील.

बाप अत्यंत गरीब असला, आणि त्यास पुस्तकें मिळण्याचा अभाव असला, तर त्यानें आपल्या शेजारी पाजारी घडत असलेल्या खऱ्याच गोष्टी सांगाव्यात. उदाहरणार्थ, सांगावें कीं कोणी एक मुलगा किंवा मुलगी दागिन्या साठीं नाहींशीं केली.

आणखी सांगावें कीं, अमुक मुलगा कसा निष्काळजीनें झाडावर चढला आणि पडून त्याचा पाय मोडला. ती फलाणी मुलगी अस्ताव्यस्तपणानें विस्तवा पाशीं खेळत होती आणि साडी पेटून पहा कशी भाजली ती! असेंच आणखी कांहीं.

**पदार्थाचें शिक्षण** — जो बाप शहाणा आहे, तो मुलास उपयोगी आणि मनोरंजक पदार्थ दाखविल्या वांचून राहणार नाहीं.

खालच्या नांवनिशी वरून उदाहरणें कळतील.

खाण्याचीं धान्यें– जसे तांदूळ, बाजरी, जोंधळें गहू, इत्यादि.

मुख्य मुख्य बीजें.

मुख्य मुख्य धातू.

मुख्य मुख्य लांकडें.

मुख्य मुख्य दगड.

मुख्य मुख्य अपक्क जिन्नस. जसे कापूस. लोंकर, रेशीम, कातडें, मध आणि असेच दुसरे.

एखादा लहानसा छापखाना.

एखादा तेलाचा घाणा.

कुंभाराचें चाक.

कोष्टयाचा माग.

उसाचा चरक.

फिरती चाती.

कापसाचा रहाट.

झाडें, वनस्पती, वाढविण्याची रीति. जसें- कातरा, मांडणी, कलम, लागवड इत्यादि. एक उंदराचा सापळा दाखवावा. आणि त्या वरून जंगलांतील हत्ती, वाघ, वगैरे क्रूर प्राणी रानांत कसे धरतात तें समजून सांगावें. अशा तऱ्हेनें मूल प्रत्येक दिवशीं कांहीं ना कांहीं तरी नवें शिकेल,

असें करावें. अशा रीतीनें थोड्याच वर्षांत मुलां जवळ ज्ञानाचा पुष्कळ भरणा होईल, आणि तें संपादन करतांना त्यास मनस्वी आनंद होईल. आणि पुढें ही त्याची ग्रहणशक्ति अत्यंत विकास पावेल.

**गणीत**—फळें, बिया, शिपा, इत्यादि पदार्थ घेऊन उदाहरणांनीं मुलास हिशेब करून दाखवावेत. आपल्या देशांतील वेळाचीं कोष्टकें मुलांस तोंड पाठ करावयास लावावींत.

**विचार शक्ति उत्पन्न करणें**—हें बाल्य दशेंत जितकें अधिक तुह्मी कराल, तितकें तें थोर पणांत फायदेशीर होईल. साधेपणानें आणि चातुर्यानें मुलाची समजूत घालण्या विषयीं जपावें. आपण ज्या वेळेस आज्ञा किंवा प्रतिबंध ह्यास तत्पर राहण्या विषयीं सांगतों, तेव्हां तें तसें कां करावें ह्याची ही फोड करून त्यास सांगावें. जेव्हां मूल एखादी गोष्ट फोडून सांगत असतें, किंवा त्याचीं कारणें सांगतें, तेव्हां तीं नीट ऐकून घेऊन त्यास उत्तेजन द्यावें. मुलें आपआपसांत जर एखादा वाद करूं लागली, तर आपण ऐकून घेऊन कोणती ही गोष्ट करण्यास मंजुरी द्यावी किंवा प्रतिबंध करावा. मुलामुलांत एखाद्या गोष्टी विषयीं मतभेद पडेल तर आपण बापा कडे जाऊंया असे त्यांच्या मनांत येईल,

अशी सवंय लावावी. ह्या बाबतींत आपणास विशेष त्रास पडला असें समजूनये. मुलांस कारणांची फोड करून सांगण्याच्या महत्वाची योग्यता मनांत आणून तुह्मी तदनुसार लौकर सुरवात कराल, तर ह्या बाबतींत बालशिक्षणाचें शेकडों नवे नवे मार्ग तुह्मास आढळतील.

**उत्तरें देऊन प्रश्न करण्या सारखें त्यास उत्तेजन देणें** — स्वाभाविक चमत्कृति दृष्टीस पडली, कीं नेहेमीं मूल त्या संबंधानें प्रश्न करतें. तसें करण्या बद्दल त्यास रागें भरूनये, किंवा हिडिस् पिडिस् करूनये. तर असें प्रश्न करणें हें एक ज्ञानसंपादनाचें उत्सुकता दर्शक सुचिन्ह असें समजलें पाहिजे. "चप्प बैस" ह्मणून मुलास कधीं दटावूं नये. तर आनंदानें आणि चतुरस्रपणानें त्यांचीं उत्तरें द्यावींत. मुलानें तुमच्या टेबला जवळ येऊन विचारलें कीं हें काय आहे? तर—

उत्तर—हें कागदाचें वजन आहे.

"हें काय करावयाचें?"

उत्तर—कागद वाऱ्यानें उडून जाऊंनयत ह्मणून त्या वर ठेवावयाचें.

"मग नुसता दगड ठेवला तर नाहीं कां चालायचें?"

**उत्तर**—चालेल, पण दगड टेबला वर विशोभित दिसतो. हें दिसण्यांत सुंदर असून कामच्या काम होतें.

"हा तांबडा कागद कसला?"

**उत्तर**—ह्याला टीप कागद ह्मणतात.

"हा कशाला?"

**उत्तर**—हा शाई टिपून काढायला.

"ती कशी टिपायची?"

**उत्तर**—अशी—

अशा रीतीनें विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें द्यावींत. ह्यांत आपणास त्रास पडला असें समजूनये. ह्मणजे येणें करून मूल आनंदांत राहून वस्तूचें ज्ञान वाढेल. मनुष्यें सर्व ज्ञान कांहीं एका दिवसांत संपादन करी नाहींत. तीं हळू हळू आणि पायरी पायरीनें संपादन करतात. अशा रीतीनें संपादन केलेलें ज्ञान एकदम मोठा घांस घेऊन प्राप्त होणाऱ्या ज्ञाना पेक्षां मनांत फार चांगलें ठसतें.

एखाद्या वस्तूचें वर्णन तोंडानें सांगण्या पेक्षां ती वस्तु प्रत्यक्षच दाखवावी हें उत्तम—केवळ शब्दोच्चाराच्या साधना पेक्षां प्रत्यक्ष पदार्थ पाहूनच मुलास स्वतःच्या बुद्धीनें उत्तम ज्ञान होतें. तसें दुसऱ्या कशानें होणार नाहीं.

ह्या करितां आपल्यास ज्या पदार्थांची मुलास माहिती व्हावी अशी इच्छा असेल तो पदार्थ विशेषें करून प्रत्यक्षच आणून दाखवावा. मुख्य मुख्य पशू, पक्षी, मासे, त्यांस दाखवावेत. मेलेले नव्हत, पण जिवंत. झाडावर किंवा वृक्षावर असलेलीं चांगलीं चांगलीं फुलें दाखवावीत. त्याच प्रमाणें चांगलीं चांगलीं फळें. भोवतालची प्रत्येक वस्तू मुलास पूर्णपणें पाहूं द्यावी. सावकाशपणें पाहूं द्यावी. घाई करूंनये. प्रत्येक पदार्थ पहात पहात आपल्याच हौसेनें मूल जितकें जितकें खोल विचारांत शिरेल तितकें शिरूं द्यावें. केव्हां केव्हां जिन्नस कापून त्याच्या आंतील भाग दाखवावा. फळें वगैरेचा आंतील भाग पाहिला ह्मणजे तो पदार्थ मनांत चांगला ठसतो.

जेणें करून मुलाची ग्राहकशक्ति अधिक चौकस आणि अधिक विकसित होईल, त्या मुख्य तत्त्वावर लक्ष दिलें पाहिजे. ह्मणजे मानसिक शक्ति वर्धन करण्यास सहज कारण होईल.

ह्या गोष्टी कडे दुर्लक्ष केल्यामुळें आपल्या पैकीं पुष्कळ लोकांच्या मनाचा पळपळीतपणा, नेबळेपणा, आणि साधारण कच्चेपणा नेहेमीं दिसून येतो. आणि असल्या सवंयी एकदा लहानपणीं जडल्या, ह्मणजे त्या

थोरपणीं ही तशाच राहतात, आणि साऱ्या जन्मांत आड येतात.

मीं आगगाडीचें वर्णन जरी पुष्कळ ठिकाणीं वाचलें होतें, तरी ती प्रत्यक्ष पाहून तींतून प्रवास करी पर्यंत तिच्या खऱ्या स्वरूपाची नीटशी कल्पना माझ्या मनांत आली नव्हती, ह्या गोष्टीचा मला स्वतःला अनुभव आहे.

तसेंच बर्फाचा खडा मी खुद्द आपल्या हातांत घेई पर्यंत "बर्फ" ह्मणून काय पदार्थ हें मला समजलें नव्हतें!

"स्नो" ह्मणून कसला पदार्थ असतो, त्याची मला हा वेळ पर्यंत कल्पनाच होत नाहीं, व त्यावर स्केटिंग ह्मणजे काय तें मुळींच समजत नाहीं. 'व्हाय ओलेट' नांवाच्या पुष्पा बद्दल इंग्रजीं कवितेमध्यें मीं पुष्कळ वाचलें होतें तरी फार दिवस पर्यंत तें कोणतें ह्मणून समजलें नव्हतें. खरेंच आहे. ज्यांनीं आजन्मांत समुद्र पाहिलेला नाहीं, त्यांस त्याचें खरें स्वरूप ध्यानांत येणार नाहीं. जुन्या पंडितास सिंह ह्मणजे काय कांहीं कळत नाहीं. किंवा दुर्बिण, सूक्ष्मदर्शक यंत्र ह्यांचा उपयोग त्यांस मुळींच माहित नाहीं. पाउंड, शिलिंग, फार्दिंग, ह्यांची जरी प्रत्येक अंग गणितांत उदाहरणें सांगितलेलीं असतात, तरी पुष्कळ मुलांस तीं

नाणीं कशीं असतात तें माहित नसतें. तसेंच त्यांत सांगितलेलीं वजनें आणि मापें ही त्यांस कळत नाहींत. औषध घेण्याचा प्रसंग आला कीं, आपले लोक वाइनग्लास ह्मणजे काय, टेबलस्पून ह्मणजे काय, टीस्पून ह्मणजे काय, डेझर्ट स्पून ह्मणजे काय, ह्या घोटाळ्यांत पडतात. नांवाजलेल्या विद्यार्थ्यास सुद्धां ग्यालन ह्मणजे काय तें बरोबर कळत नाहीं, किंवा फर्लांग ह्मणजे किती लांबीचा, ह्याची खुणा करा ह्मटलें तर करतां येणार नाहीं.

**कारण सांगणें**— एकादी चांगली गोष्ट घडली, किंवा वाईट गोष्टघडली, तर त्याचें खरें कारण काय तें मुलांस सांगावें. उदाहरणार्थ— एखादें घर जळून गेलें, तर सांगावें कीं स्वयंपाक करातांना विस्तवाकडे दुर्लक्ष केल्यामुळें असें झालें. एखाद्या मुलानें बक्षीस मिळविलें, तर हें त्याच्या उद्योगाचें फळ ह्मणून सांगावें. सारांश,

१ बरा किंवा वाईट वेळ.
२ सुदैव किंवा दुर्दैव.
३ इष्ट किंवा अनिष्ट ग्रहदशा.
४ प्रारब्ध.

अशा तऱ्हेचीं कारणें बापानें सांगूनये. कारण ह्या गोष्टी निखालस निराधार, खोट्या, आणि समजावयास कठीण, अशा आहेत.

हजार दिशांनीं मनुष्यांस प्रयत्नानें आणि चातुर्यानें संकटें टाळतां येतात.

ह्या समजाचा अपल्या लोकांत जितका प्रसार होईल, तितकें त्यांच्या भरभराटीस आणि उन्नतीस कारण होईल.

**आपण सांगत बसण्या पेक्षां मुलास शोधून काढावयास लावावें**– उदाहरणार्थ, एखादें मूल विचारील "समुद्राचें पाणी पिण्यास चांगलें आहे काय?" ह्या प्रश्नाचें उत्तर देत बसण्या पेक्षां मुलासच समुद्रापाशीं न्यावें. आणि त्यालाच तें तोडांत घालून पाहूं द्यावें.

तसेंच, उकडलेले भात पेरलें तर उगवून येईल काय?
भाजलेल्या बियास मोड फुटतील काय?
सोललेलें बीं उगवेल काय? ह्या सर्व गोष्टींचा मुलास प्रत्यक्ष अनुभव घेऊन पहावयास सांगावें.

**फक्त एखाद्याच्या तोंडच्या बडबडी वरून किंवा छापील पुस्तका वरून मिळविलेल्या ज्ञानापेक्षां मुलांनीं स्वतः पाहून संपादन केलेलें ज्ञान उत्तम**— हें नीट ध्यानांत येण्याला एक दोन उदाहरणें बस्स आहेत. समजा; कीं मुलाला मोर कसला असतो, हें समजण्याची इच्छा अहि. तर तो पक्षी प्रत्यक्ष

डोळ्यांनीं पाहिला असतां, जसा बरोबर मनांत भरेल, तसा कोणी किति ही समजून सांगितलें, किंवा छापिल वर्णन किती ही वाचलें तरी मनांत भरणार नाहीं. तसेंच जलपर्यंणा विषयीं विचारील, तर त्याला प्रत्यक्षच अनुभव घेऊं द्यावा.

मुलानें वस्तु पाहून स्वतः संपादन केलेलें जें ज्ञान तें पहिल्या प्रतीचें. पुस्तकें वाचून किंवा तोंडच्या शिक्षणानें मिळविलेलें जें ज्ञान तें दुसऱ्या प्रतीचें.

दुसऱ्या पेक्षां पहिलें ज्ञान उत्तम, हें उघडच आहे. पहिलें मिळण्या सारखें नसेल, तर दुसऱ्या वर अवलंबून राहणें भाग आहे.

बुद्धि ही ज्ञानाचा उगम आहे, ह्यास्तव ती चपल आणि तीक्ष्ण केली पाहिजे— ह्याला उत्तम उपाय ह्मटला ह्मणजे त्याजकडून आवडतें आणि परिपाठांतलें नाना प्रकारचे बुद्धिचे व्यवसाय करविले पाहिजेत.

मुलाला अशा प्रकारच्या सवंयी लागण्या विषयीं बापानें खटपट करून त्यांची कांहीं तरी व्यवस्था लावून द्यावी.

पाहण्याची सवंय, ऐकण्याची सवय, वास घेण्याची सवय, चाखून पहाण्याची सवय, हात

लावून पहाण्याची सवय, ह्या सर्व सवयी ग्राहक-शक्तीचा विकास करणाऱ्या आहेत.

असें केलें ह्मणजे मूल ह्या पैकीं एक किंवा अनेक कारणानें कोणती ही वस्तु ओळखण्यास व शोधून काढण्यास शिकतें. ह्या वरून इतकें सिद्ध होतें कीं, इतर मुला पेक्षां ज्या मुलाची बुद्धि अधिक तीव्र असतें, तें मूल दुसऱ्या मुला पेक्षां ती वस्तु चांगल्या तऱ्हेनें ओळखतें, व त्यांतील गुणदोष अधिक शोधून काढतें.

**तसबिरी पहाण्याची गोडी लावावी**— हें सर्वांत आवश्य आहे, कारण आपल्यांतील मोठमोठ्या लोकांस ह्या रुचीची कमताई आहे. तसबिरी पाहून मुलांस स्वाभाविकच आनंद होतो ह्यासाठीं मुलास अगोदर साधीं साधीं चित्रें दाखवावींत, ह्मणजे जे पदार्थ नेहेमीं मुलाच्या पहण्यांत असतात, त्यांचींच चित्रें दाखवावींत.

प्रारंभाला पदार्थांच्या मूळ रंगा प्रमाणेंच चित्रें दाखविण्यास उत्तम. साधीं चित्रें दाखवितां दाखवितां मग अवघड अवघड दाखवावींत ह्मणजे थोड्याच दिवसांत, शुद्ध काळ्या आणि शुद्ध पांढऱ्या रंगाचीं चित्रें समजूं लागतील. नंतर स्वस्त किमतींत मिळणारे 'इल्युस्ट्रेटेड लंडन न्यूज' 'ग्र्याफिक' वगैरे वर्तमान

पत्राचे जुने अंक मुला पुढें टाकावेत.

मुलाचें चित्त चित्रांत अगदीं गर्क होऊन, तें आपल्या हातांनीं काढण्याचा प्रयत्न करूं लागेल, तर त्यास थोडीं चित्रें काढावयाला ही शिकवावींत.

**गाणें** – जनावराचा शद्ब हुबेहब काढल्या वरून; मनच्याच गुणगुणी वरून; गाण्याच्या योगानें प्रसन्नता दाखविल्यावरून; किंवा स्वतः गात असल्यावरून; कधीं कधीं मुलाची स्वभावसिद्ध प्रकृति गाण्याकडे असल्याचें दिसून येतें. असें दिसण्यांत येईल तर त्यास गाणें शिकवावें. ह्मणजे मोठेंपणी त्यास करमणुकीस कारण होईल.

**सृष्टि सौंदर्य**— जेथें जेथें ह्मणून दृष्टीस पडेल तेथें तेथें मुलाचें लक्ष त्याकडे लावावें. त्यास सुंदर सुंदर रंगाचीं पुष्पें दाखवावींत, आणि सांगावें कीं, हीं किती बरें शानदार दिसतात? ह्मणजे लागलीच मुलास त्याची चट लागेल, आणि त्यासही तसेंच वर्ण करावयाची सवंय लागेल.

सकाळीं रपेटीहून येतांना सुंदर आणि ताजीं फुलें घरीं आणावींत. आणि तीं फार बेतानें आणि सुंदर रीतीनें दंवासुद्धा कशीं तोडलीं आहेत तें दाखवावें. तसेंच तीं हातानें न चुरडतां एका लहानशा परडींत जशीच्या तशीं नीट रीतीनें लावून ठेवावींत. फूल घेट

व थोडीं पानें ह्या सहवर्तमान तोडलें, ह्मणजे अधिक सुंदर कसें दिसतें हें दाखवावें. ह्मणजे त्यास मौज वाटेल. आणि तें तशीं फुलें तोडूं लागलें तर, तीं तोडूं द्यावींत.

घरीं येतांच एकेक फूल काढून तें अधिक शोभिवंत दिसण्या साठीं केळीच्या पानावर किंवा पांढऱ्या बशी वर ठेवावें. आणि तीं थोड्याशा पाण्याच्या पात्रांत ठेवलीं नाहींत, तर कशीं कोमेजतात, तें मुलास दाखवावें. तीं एका पात्रांत किंवा ग्लासांत ठेवावींत. नंतर तऱ्हेतऱ्हेची निवडानिवड करून एक सुंदर गुच्छ बनवावा.

असें केलें ह्मणजे मुलाची फुलांविषयीं रुची वृद्धिंगत होईल, आणि आनंदाचा ही उद्भव होईल. आपले लोक फुलाच्या रंगा पेक्षां व आकारापेक्षां वासाची मातब्बरी अधिक समजतात. मुलाला दोहोंचें ही महत्व शिकवावें. मुलांस बाग बगिचे इत्यादि ठिकाणीं घेऊन जावें, आणि तेथील उत्तम उत्तम आकृती, मांडणावळ, इत्यादि देखावा दाखवून त्याचें वर्णन मनांत भरवावें. वर सांगितलेलें सर्व सहज आणि सुखांत होऊन अभिरुचि वाढतें. आणि सारा जन्म आनंदांत जातो. हें मी स्वानुभवा वरून सांगतों. हा विषय ध्यानांत ठेवण्या सारखा आहे. कारण सांप्रतकालीं आपल्यां-

तील सुशिक्षित लोकांत ही ह्याची गोडी फार कमी आहे. आपल्यांत अल्प ऐष आराम किंवा सहजानंद ह्यांची वृद्धि झाली पाहिजे.

**मुलास शिक्षा**— सर्व शिक्षे मध्यें मुलास छड्या मारणें हें फार वाईट आणि अपायकारक आहे. तसेंच हातानें मारणें ही वाईटच. अशा शिक्षेनें बिघडून कुचकामीं झालेलीं पुष्कळ मुलें मला माहित आहेत.

समंजस बापाच्या बहुत करून ध्यानांत येईलच कीं, मुलास अशा निर्दयत्वानें शिक्षा करण्याची कांहीं जरूरी नाहीं. मुख्य उद्देश हा, कीं मुलाला शरिरानें वळविण्यापेक्षां मनाच्या द्वारें वळविलेलें चांगलें. मुलाच्या मनास आनंद होण्यास जसें बक्षीस कारण होतें, तसें दुःख होण्यास शिक्षा कारण होतें.

सहजी गोष्टीनें जसा मुलास आनंद होतो, तसें सहजी गोष्टीनींच त्यास दुःख होतें.

साधारणपणें मुलास शिक्षा करावयाची तर बक्षीस देणें बंद करावें. कधीं देऊंच नये; कधीं लांबणी वर टाकावें; कधीं दिलेलें परत घ्यावें. आणि कित्येक प्रसंगी पूर्वींच्यांतील एक काढून घ्यावें. ह्यावरून शहाणा व विचारी बाप आहे तो, मीं दृष्टांत देऊन सांगितल्या प्रमाणें बक्षीस व शिक्षा ह्याची योजना करील.

समजा; कीं एका मुलानें कांहीं खोडी केली, तर बापानें त्यास ह्मणावें "तूं अमुक अमुक अपराध केला आहेस, ह्या करितां तुला मी अमुक अमुक बक्षीस देणार होतो तें आतां देणार नाहीं."

'मी तुला सार्वजनिक बागेंत घेऊन जाणार नाहीं.'

'मी तुला प्रदर्शन पहावयाला नेणार नाहीं.'

'मी तुला त्या फलाण्या देवाच्या उत्सवाला नेणार नाहीं.'

'मी आपल्या गाडींतून फिरावयास जाताना बाकीच्या मुलाना घेऊन जाईन, पण तुला घरांतच बसलें पाहिजे.'

'मी खाऊं वाटतांना तुझी वाटणी द्यायचाच नाहीं.'

'मी बाकीच्या मुलांना चित्रें आणून देईन, तुला नाहींच द्यावयाचा.'

'मी तुला 'म्याजिकल्यांटर्न' दाखवावयाचाच नाहीं.'

'माझ्या जवळ पुष्कळ चित्रांचीं पुस्तकें आहेत, पण मी तुला एक सुद्धां देणार नाहीं.'

'मी तुझ्या बरोबर बोलायचाच नाहीं.'

'मी तुला हातखर्चाला पैसेच देणार नाहीं.'

'मी आतां देतों त्यांतून ही कमती करीन.'

'ती अमकी अमकी वस्तु मी तुझ्या पासून माघारी घेईन.'

येवढ्या उदाहरणा वरून त्यांतील मतलब समंजस बापाच्या लक्षांत येईल. मूल एखाद्या पदार्थाचा गैर उपयोग करील, तर तो पदार्थ त्याजकडून काढून घ्यावा. उदाहरण- तें जर एखाद्या चाकराला चाबकानें मारील, तर ती चाबुक त्याज कडून हिसकावून घ्यावा. तें जर आपल्या भावाला किंवा बहिणीला जोरानें चेंडू मारील, तर तो चेंडूच त्याजकडून हिसकावून घ्यावा; किंवा तें जर कोणास आपली छत्री मारील, तर ती छत्री त्याज पासून काढून घ्यावी.

तें जर कोणती ही वस्तु अत्यंत हयगयीनें मोडील किंवा गमावील, तर बापानें ती पुन्हा घेऊन देऊंनये, तर तें मुलास नुकसान कळेसें करावें. जर एखादें मूल दुसऱ्या मुलाची वस्तु दांडगाईनें पळवील, तर लागलीच ती ज्याची त्यास देववावी. जर एकानें दुसऱ्याची वस्तु मोडली, किंवा हवरली, तर हरवणारा कडून त्या वस्तूची किंमत त्यास भरून द्यावी.

मुलानें कांहीं खोडी केली, तर ती लगेच दुरुस्त करवावी. उदाहरण, खोलींत जर कागदाचे तुकडे पसरले असतील तर ते सारे त्याज कडून गोळा करवून कचऱ्याच्या टोपलींत टाकवावेत. भिंतीवर रेघा ओढल्या असतील तर लागलीच त्या त्याच्या कडून पुसवाव्यात. जर दुसऱ्याचा कांहीं खेळावयाचा जिन्नस

मोडला असेल, तर त्याच्या स्वतःच्या खाऊच्या पैशातून तसलीच जिन्नस आणवून ज्याची त्यास द्याव-यास लावावी.

सारांश काय, कीं आपण साधरणपणें मनुष्या मध्यें जसें वर्तन ठेवतो, त्याच नियमानें मुलाशीं वर्तन ठेवावें. ह्मणजे हाच न्याय मुलें थोर होऊन जगांत व्यवहार करूं लागतील त्यांचें प्रतिबिंब व्हावें. असें केल्यानें तीं जगांतील व्यवहारांत लौकरच वाकबगार होतील.

मुलास कृतापराधा बद्दल पश्चात्ताप होण्याची सवंय लावावी. त्यानें आपल्या तोंडानें स्पष्ट सांगावें कीं मी पुन्हा असें वर्तन करणार नाहीं. शिक्षा करतांना तोंडची शिक्षा, धमकी, दोष लावणें, नाखुषी, बोध हीं सर्व असावींत. व ह्यांचा ज्या प्रसंगीं जो उचित वाटेल तो उपयोग करावा.

मुलाशीं उपदेश करतांना निष्ठूर आणि अपशद्व बोलूंनयेत. संशयित जागीं भलतेंच उत्तर दिलें तर, आपल्या वरिष्ठानें आपणास जसें वागवावें असें बापास वाटत असेल, त्याच तत्वानें त्यानें मुलास वागवावें. उदारहण. मुलास गाढवा, मूर्खा, असें कधीं ह्मणूंनये.

मूल अडखळून किंवा ठेंच लागून पडलें; किंवा अकल्पित एखादी वस्तु त्याच्या हातून फुटली; चुकून

खुर्ची पडली; दौत पालथी झाली; पेन्सल मोडली; स्लेट पाटी फुटली; एखादें चित्र मळलें किंवा फाटलें, इत्यादि चुकून घडलेल्या गोष्टी साठीं मुलांस शिक्षा करूंनये.

खेळतांना दुसऱ्याची पाठ शिवणें, गलबला करणें, मोठ्यानें हासणें, पशू पक्ष्या सारखें ओरडणें इत्यादि निरुपद्रवी कृत्या बद्दल मुलास शिक्षा करूनये. नको ह्मटल्या वर करील तर मात्र शिक्षा केल्या वाचून राहूंनये. आई बापांची आज्ञा मोडल्यास मुलास योग्य शिक्षा केली पाहिजे. आतां ज्या प्रसंगीं मुलाच्या खोड्यांनींच त्यास दुखापत होईल त्या प्रसंगीं आपण आणखी त्यास शिक्षा करूंनये. उदाहरण. एखाद्या उंच जाग्या वरून मूल पडलें, आणि तेणें करून त्याचेंच आंग ठेचलें, आणि दुखूं लागलें, तर ती रितीचीच गोष्ट आहे. तेवढी शिक्षा त्यास बस्स आहे. तेवढीनें तें पुढें सावध होईल. त्यांत आपण आणखी शिक्षा करण्याची आवश्यकता नाहीं. असें असतां तशा प्रसंगीं ही बाप शिक्षा करतो, हें गैर आहे.

हें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं आपल्या कृतीच्या शिक्षेपेक्षां वर दाखल केलेली आपोआप घडलेली शिक्षा उत्तम.

**बक्षीश आणि शिक्षा** — व्यवहारांत जाणत्या मनुष्यांच्या नियमनार्थ जशीं बक्षीस आणि शिक्षा अवश्य आहेत, तशींच तीं मुलास ही अवश्य आहेत. साधारणरीत्या गुणवानास उत्तेजन येण्यासाठीं बक्षीस देतात, व दुष्टाचा मोड होण्या साठीं शिक्षा करतात. तीच गोष्ट मुलास ही लागू आहे.

दोहीं मध्यें ही उद्देश एकच, कीं बक्षिसाच्या योगानें आणि शिक्षेच्या योगानें त्यांनीं नीट रीतीनें चालावें. मुलांच्या बाबतींत एक मात्र भेद आहे, तोहा कीं मुलांचीं बक्षिसें आणि शिक्षा थोराच्या बक्षीस व शिक्षेपेक्षां फार सौम्य आणि क्षुल्लक असतात.

मुलांस बक्षिसें देणें तीं वारंवार आणि हवीं तितकीं अशीं देऊं नयेत. नाहीं तर मुलाला वटकेवटकेला मला आणखी द्या आणखी द्या ह्मणण्याची सवंय लागते. तसेंच शिक्षा देणें तीही वारंवार देऊंनये व फार ही देऊंनयें.

बक्षिसाच्या योगानें योग्य वळण लागावें, आणि तसेंच शिक्षेनें द्वाडपण दूर व्हावें. प्रत्येकाच्या योगानें मनांतील हेतु सिद्ध व्हावा, ह्मणजे सुजनपणाला उत्तेजन यावें, आणि दुर्जनपणाला भीती उत्पन्न व्हावी.

एकंदरींत प्रत्येक गोष्ट प्रमाणा बाहेर जाऊंनये. ह्मणजे बक्षीसाचें आणि शिक्षेचें प्रमाण नीट राखावें.

याचा स्पष्ट अर्थ इतकाच कीं, बक्षीसाचा व शिक्षेचा असद्विनियोग करूंनये. मुलांस बक्षिसें देतांना बापानें राजा प्रमाणें निःपक्षपाती व्हावें. मुलांस शिक्षा देतांना बापानें एखाद्या निःपक्षपाती आणि गंभीर न्यायाधिशा प्रमाणें व्हावें.

अशारीतीनें क्रम ठेवला, तर त्यांस हळू हळू तशी संवय लागून ज्या जगाच्या व्यवहारांत पुढें तीं पडणार त्यांतील रस्ते त्यांस उत्तम प्रकारें अवगत होतील. बक्षीसें किंवा शिक्षा देणें तीं बापानें मुलांच्या चाली रीती पाहून ठरवावींत. आपल्या मुलाविषयींच्या आवडी नावडी वरून ठरवूं नयेत.

आईनें शिफारस केली ह्मणून बापानें मुलास मोठें बक्षीस, किंवा कडक शिक्षा देऊंनये. थोडा किंवा पूर्ण पश्चात्ताप झाला असेल, व तें पुढें नीट वागण्याचें कबूल करील, तर त्यास शिक्षा कमी करावी किंवा मुळींच करूंनये. अतिशय बक्षिसानें मूल बिघडतें, आणि अतिशय शिक्षेनें मूल कोडगेंहोतें. प्रत्येक बक्षीसाच्या वेळीं हें बक्षीस चांगल्या वर्तणूकी बद्दल मिळालें आहे, असें त्यांच्या मनांत वाटलें पाहिजे. तसेंच प्रत्येक शिक्षा भोगतांना त्यास वाटलें पाहिजे, कीं ही शिक्षा आपल्या अमुक गैर वर्तणुकी बद्दल आहे.

असें केलें ह्मणजे, चांगली वागणूक कोणची, व वाईट वागणूक कोणची, हें लौकर कळूं लागून त्या प्रत्येकाचा परिणाम ही त्याच्या मनांत वागेल.

बक्षिस देतो ह्मणून सांगण्यांत घाई करून मग तें न देणें असें करूंनये; किंवा शिक्षा देतो अशी धमकावणी देण्याची घाई करून मग ती शिक्षा न देणें असें ही करूंनये.

बक्षीस किंवा शिक्षा देतो ह्मटलें कीं मिळणार, असा मुलाच्या मनाचा निश्चय व्हावा. ती केवळ तोंडची बडबड आहे असें त्यास वाटूंनये. सदाचरण स्वीकारल्यानें आणि दुराचरण टाकल्यानेंच मुलांस आनंद होईल अशी सवय लावावी. केवळ बक्षिस मिळविण्या करितांच, किंवा शिक्षा टाळण्या करितांच तसें वागावयाचें असें वाटूंनये, तर तें आपल्या स्वतःच्या बऱ्या साठीं केलें पाहिजे असें त्यास वाटावें.

बक्षीस किंवा शिक्षा देणें ते ती आई पेक्षां बापानें दिलेली चांगली. कारण, बाप आईपेक्षां अधिक बुद्धिवान, तारतम्यज्ञानी, आणि निग्रही असतो.

**मुलांस बक्षिसें** — ज्या ज्या वस्तू पासून मुलाच्या मनास आनंद होतो, त्या त्या वस्तू मुलास बक्षिस देण्याच्या ठरवाव्यात. थोड्या बक्षिशीनें मुलास आनंद होतो असें वाटलें, तर बक्षिसें

वादबावींत. विचारशील बाप नाना प्रकारचीं बक्षिसें योजून काढतो.

उदाहरणा साठीं खालीं थोड्यांचें दिग्दर्शन करतों.

फळफळावळीचें बक्षीस ठरवावें.

तसेंच मेवामिठाई.

नाना प्रकारचीं घरगुती पक्वान्नें.

खेळ (गांवठी किंवा विलायती.)

चित्रांचीं पुस्तकें.

रबराचे चेंडू.

मोठें दिसण्याचे भिंग.

एखादा चाकू.

एखादी कात्री.

सुया.

खेळावयाच्या गोट्या.

एखादी कांचेची नळी, पिचकारी, भोंवरा किंवा लोह चंबुक.

पैलूदार भिंग.

**कालिडो स्कोप.**

समुद्रकाठच्या निरनिराळ्या शिंपा व शंख.

कमरपट्टा किंवा करदोडा.

लहान पक्ष्याचा पिंजरा.

रावूचा पिंजरा.

लहानसें टेबल किंवा खुर्ची.

एखादें लहानसें कपाट.

चिमणी.

छत्री.

एखादी छडी, चाबूक किंवा, काठी.

स्लेट पाटी.

दौत.

कांहीं पेनें व पेनसलीं.

रूळ.

एखादा मोजावयाचा फूट.

एखादी तराजू; सुंदर सुंदरशीं कागदावर ठेवावयाचीं वजनें.

लहानशी नोटवही.

बाजवावयाची घंटा. लहानसा हात- कंदिल.

पुष्पपात्र.

शानदारशी इंत्री.

नवी सुंदरशी टोपी.

लहानसा म्याजिक ल्यांटर्न.

दुसऱ्या मुलाशीं खेळण्यास परवानगी.

आईबापा बरोबर गाडींतून किंवा पायीं फिरावयास जाणें.

सार्वजनिक बाग, त्यांतील पशु, पहावयास जाणें.

पदार्थ संग्रहालय पाहण्यास जाणें.

देवाच्या उत्साहास देवळांत जाणें.

एखादा खेळ पहाणें.

होडींत बसून जाणें.

लहान तट्टावर बसून फिरावयास जाणें.

बागेंतील फुलें तोडणें.

मळ्यांतून भाजी पाला व फळफळावळ आणणें.

समुद्र, नदी, किंवा पर्वत पहावयास जाणें.

देव दर्शनास जाणें.

बाजार पहावयास जाणें.

आगगाडींतून थोडीशी सहल करणें.

फटक्याच्या पेट्या.

एखादा सुंदरसा हातरुमाल.

पायांत घालावयाला जोडा.

आईचा, बापाचा, भावाचा, किंवा बहिणीचा फोटोग्राफ.

बाग लावावयाला लहानसा जमिनीचा तुकडा.

बागे संबंधी लहान हत्यारांचे जोड.

एखादा आरसा.

फणी किंवा ब्रुरूस.

उडवावयाला पतंग.

कुलुंगें कुत्रें.

खेळावयाला वासरूं, नाहीं तर कोकरूं.

चांदणें भोजन.

आपले मित्र किंवा खेळगडी भोजनास बोलावयास परवानगी.

पर्वणीला नदीवर किंवा तलावावर स्नान.

बोटांत घालावयाला लहानशी आंगठी.

जिन्नस पान्नस ठेवायला आंगच्या कुलूप किल्लीची लहानशी पेटी.

रंगारंगाचे काचेचे मणी आणि खोटीं मोतीं.

एखादी ढकलायाची गाडी किंवा हातगाडी.

लहानशी बाजाची पेटी.

नवें पाणी पिण्याचें भांडें किंवा तसल्याच दुसऱ्या कांहीं जिनसा.

किल्ले, घरें, बांधण्याचा गंजिफांचा जोड वगैरे.

बावल्या करावयाला परोपरीच्या रंगाच्या चिंध्या.

बावल्याला दागदागिने करावयाला थोडीशी लाख आणि बेगड.

मुलास वाटतील तीं चित्रें करायला कुटलेला चिखल.

धंदा.

शाबासकी वगैरे देऊन बापाची पसंती दर्शविणें.

एका ममतेच्या चुंबनाची मुद्धां बक्षिसांत गणना

करतां येईल.

प्रत्येक महिन्या महिन्यास थोडासा पैसा देणें.

हात खर्चीचा पैसा — प्रत्येक महिन्याच्या अखेर मुलास थोडीशी रक्कम बक्षीस द्यावी. ती त्याची हक्काची ह्मणून देऊंनये; तर महिन्या मध्यें केलेल्या चांगल्या वर्तणुकी बद्दल इनाम द्यावी. ह्या हातखर्ची पैशाचा उपयोग पुढील पगाराचा उपयोग करतां यावा हा आहे. हा पैसा धनी जसा चाकरास देतो त्या प्रमाणें महिन्या महिन्यास नेमानें आणि वेळच्या वेळीं देत जावा.

असें केलें ह्मणजे मुलास पुढें एखाद्याची नोकरी पतकरली तर पगार केव्हां मिळणार तें कळेल. महिना भरण्याच्या पूर्वीं पैसा मिळण्याची आशा दाखऊंनये. ह्मणजे मुलें आपल्या पगाराची मुदत केव्हां भरते तें पहावयाला शिकतील. तसेंच तो पैसा महिना अखेर पर्यंत पुरवायला शिकतील. आणि पै, पैसा, अर्धा आणा, चवली, पावली, अधेली, रुपया इत्यादि तांब्याच्या व रुप्याच्या नाण्यांच्या त्यास परिचय होईल.

ह्या नाण्याच्या योगानें त्यास थोड थोडे हिशेबही करूं लागतील. मुलाला लागतील त्या जिनसा बापानें आणून देण्या पेक्षां त्याच्या त्यासच खरेदी करूं

द्याव्यात. ह्मणजे निरतिराळ्या जिनसा खरेदी करण्याचें चातुर्य ही कळून येईल. आणि मुला मध्यें हळूहळू मिनगी नमविण्याचें चातुर्य वाढेल.

मुलास पैसा जतन कसा करावा तें कळेल, व बेता बेतानें खर्च कसा करावा तें ही कळेल. थोड थोडी शिल्लक राखून पुंजी कशी करावी तें ही कळेल. श्रीमंती ह्मणजे काय, आणि गरिबी ह्मणजे काय, हें त्यास कळूं लागेल. हें सर्व ज्ञान त्याच्या वृद्धापकाळीं त्यास फार मोल्यवान वाटेल.

बाल्यदशेंत ह्या शिक्षणाची उपेक्षा झाल्या मुळें पुष्कळ लोक मूर्ख, उधळे, दरिद्रि आणि विपद्ग्रस्त झाले आहेत.

सारांश काय, कीं मुलास पैशाचा सद्व्य करावयास शिकविणें, ही सर्व गोष्टींत अत्यंत आवश्यकतेची गोष्ट आहे. तसेंच, जो बाप हात खर्चास पैसा देतो तो मुलास लौकरच पूज्य आणि परोपकारी असा वाटतो. आणि तेणें करून त्याचें मुलावरचें वजन वाढतें. इतरां पेक्षां ह्या युक्तीनें मूल बापाचा उपदेश लौकर ऐकतें.

एखाद्या मुलानें आपल्या भावा पासून किंवा बहिणी पासून किंवा स्नेह्या पासून कांहीं पैसा उसना घेतला तर, त्याचा तगादा लावण्या पूर्वी किंवा त्यानें

मागावयास येण्या पूर्वी त्याचें ऋण बरोबर मुदतीस चुकविण्या विषयीं शिकवावें.

एखाद्या मुलास आपला पैसा सांभाळवत नाहीं, तेव्हां तें आपला पैसा बापा पाशींच ठेवावयास देतें. ह्मणजे बाप होतो ब्यांकवाला, आणि मूल होतें सावकार.

बापाजवळ पैसा ठेवावया साठीं मूल आणील तेव्हां, किंवा त्यांतील परत मागेल तेव्हां, पावती दाखल लहान लहान चिठ्या करून ठेवाव्यात, आणि त्यामध्यें पैसा घेतला किती, आणि बाकी राहिली किती हें काढून मुलास दाखवावें. ह्मणजे मुलास सरकारी ब्यांक ह्मणजे काय तें कळून पुढें तिचा उपयोग कसा करावा तें समजूं लागेल.

मुलें आपले जिन्नस आपणच खरेदी करावयास जाऊं लागली, ह्मणजे त्यास अंक, वजनें, मापें, सहज कळूं लागतात. नंतर बापानें मुलास हळूहळू अनेक दुकानदारांच्या किंमतीचा पडताळा पाहून जो पदार्थ चांगला आणि स्वस्त असेल तोच खरेदी करण्यास शिकवावें.

मुलगा अंमळ जाणता झाल्यावर बापानें घरचें सामान वगैरे खरेदी करावयास जातांना त्यास बरोबर घेऊन जावें.

**नीती विषयक गुण**—ह्या गुणां पैकीं जे गुण पुढें जगांत कोणतीहो अडचण न येतां यशस्वी होण्यास उपयोगीं पडतील, ते गुण वाढविण्या विषयीं मुलास उत्तेजन द्यावें. आणि ज्यांच्या योगानें ह्याच्या उलट परिणाम होणारा असेल, त्या गुणांस वाढण्या विषयीं उत्तेजन देऊंनये.

पहिल्याचीं उदाहरणें. दुसऱ्याचीं उदाहरणें.

नम्रता. ........गर्व. अहंता.
सभ्यपणा.........कठोरपणा, अप्रासंगिकपणा.
समाधान. ........अतृप्ति.
उद्योग. ........चैन.
न्याय. ........पक्षपात.
दातृत्व. ........कृपणपणा.
वरिष्ठास मान.....वरिष्टाची अमर्यादा.
काटकसर. ........उधळेपणा.
कृतज्ञता. ........कृतघ्नता.
निष्कपट, सत्य....कापट्य, असत्य.
प्रामाणिकपणा.....अप्रामाणिकपणा.

**धर्म**—खालीं लिहिलेंलीं मूलतत्वें मुलांच्या मनांत बिंबवून द्यावींत. सर्व जगाचा उत्पन्न कर्त्ता परमेश्वर आहे. तो सर्व शक्तिमान आणि सर्वोत्तम आहे.

तो सर्व मनुष्यांचें कल्याण व्हावें असे इच्छितो. ह्मणून दुसऱ्यास सुख देणें हें पुण्य, दुसऱ्यास दुःख देणें हें पाप होय. दुसऱ्यांनीं आपल्याशीं जसें वागावें असें आपण इच्छितों, तसें आपण दुसऱ्याशीं वागावें.

**स्वातंत्र्य**—स्वतंत्ररीतीनें कसें वागावें हें मुलास शिकविणें हें मोठ्या अगत्याचें आहे. मुलास बापाच्या किंवा शिक्षकाच्या पश्चात मुखत्यारी दिली, तर त्यानें नीट रीतीनें वागण्यास शिकलें पाहिजे. तें आपणहून नीट वागलें तर ठीकच आहे. तें जर नीट न वागेल तर मागें सांगितलेल्या सुचनें प्रमाणें त्यास ताकिद द्यावी.

पुष्कळ मुलें एकत्र होऊन एखादी कर्मणूक करूं लागलीं, किंवा एखादा खेळ खेळूं लागलीं, तर त्यांतून एकास अधिकार देऊन व्यवस्थापक नेमावा. आणि तो सांगेल तें सर्वांनीं ऐकावें. मुला मुलांत तंटा झाला, तर तो पुन्हां बापाकडे घेऊन येण्यापेक्षां त्यांस आप आपसांत तोडावयास सांगावें तें बरें. तसेंच त्यास निरनिराळ्या तोडजोडी ही आपआपसांत करून तंटा मिटविण्या विषयीं उत्तेजन द्यावें. बहुमताचा अव्हेर करण्या विषयीं उत्तेजन देऊं नये.

**विचार**— जहाजाला जसें सुकाणू, तसा मनुष्याला विचार. शरीराला जसा डोका, तसा

मनाला विचार. तो मुला मध्यें, फार सावधगिरीनं विकसित केला पाहिजे, असा कीं थोरपणांत त्याला मुखत्यारीनें काम करतां यावें. सर्व शिक्षणा मध्यें अत्यंत महत्वाची गोष्ट हीच आहे.

**शास्त्रोक्तसिद्धांत**— मुलास नेहमीं सांगावें की शास्त्ररीतीनें ज्या गोष्टी सिद्ध होतात, त्या सत्य असतात. आणि त्या सर्व ठिकाणीं आणि सर्वकाल संमत असतात. ही गोष्ट जर मुलांच्या मनांत नीट भरली नाहीं, आणि शास्त्र ह्मणजे काय, ह्मणून त्यांनीं विचारलें, तर सांगावें कीं ते एक सृष्ट पदार्थांचे नियम आहेत. ते तुह्मास हळूहळू पुढें कळतील.

ह्या नव्या पद्धतीनें मुलांस संवय लागण्यास चांगलें साहाय्य होईल. वेळोवेळीं अशा गोष्टी त्यांच्या मनांत भराविल्या पाहिजेत. ह्याला उदाहरण, भूत समंध वगैरे मुळींच नाहींत.

राहूकाळ हें थोतांड आहे.

शकून किंवा प्रश्न पहाणें हें निखालस ढोंग आहे चेटूक त्याच वर्गांतलें.

**अतिशयोक्ति, किंवा सजवून भलतेच सांगणें वगैरे**— एखाद्या गोष्टीमध्यें बापास मुलाची अतिशयोक्ति दिसून येईल, तर वेळोवेळीं ती गोष्ट त्यास समजावून त्याजकडून दुरुस्त करविली पाहिजे.

**लहान लहान अपराध**— हें खचित, कीं बापानें मुलांस हिंदुस्थानांतील फौजदारी गुन्हाचा कायदा शिकवीत बसणें हें मोठें गैर आहे.

तथापि, त्यांतील मुख्य मुख्य कलमें बापानें आपल्या नजरे खालीं घालून ठेवावींत, आणि जेव्हां थोरपणांत फौजदारी गुन्हयांत गणना करण्या सारखा एखादा अपराध मूल करील, तेव्हां त्यास नीट समजून सांगून त्या बद्दल चांगली ताकीद द्यावी.

असें केलें ह्मणजे मुलाची बुद्धि दुष्कृत्यास हळू हळू पराङ्मुख होईल. आणि त्याचा परिणाम असा घडेल कीं, मूल प्रौढ वयांत आलें ह्मणजे ज्या अपराधास दंड, कैद, किंवा फटके मिळतील, असले अपराध ते कधीं करणार नाहीं. ज्या अपराधा बद्दल मुलास चांगला प्रतिबंध केला पाहिजे, त्यांचीं उदाहरणें खालीं दिलीं आहेत.

चोरी करणें, चोरलेली जिन्नस घेणें किंवा पदरी बाळगणें, फसविणें, खोडी करणें, मारामारी करणें, दुखविणें, अपशब्द उच्चारणें, खोटें दूषण देणें, खोटी साक्ष देणें, खोटी बातमी सांगणें, दुसऱ्या मुलानें ठेवण्यास दिलेल्या वस्तूचा अपहार करणें, गुन्हेगारास आश्रय देणें, इ०

प्रसंगोपात लोकामध्यें प्रौढमनुष्यांस त्या त्या अपराधा प्रमाणें कसकशा शिक्षा होतात, तें बापानें

मुलास प्रत्यक्ष दाखविणें, हें ही कांहीं वावगें नाहीं.

**अधिकारांस मान देणें**—प्रसंग विशेषीं मुलास सांगावें कीं, बाप जसा मुलाची काळजी वहातो, तसें उत्तम सरकार सर्व प्रजेची काळजी वहातें. ह्या कारितां मुलानें जशी बापाची आज्ञा पाळली पाहिजे, तशी सरकारची आज्ञा लोकांनीं पाळली पाहिजे.

**शाळेंत घालणें**— बापानें मुलास शाळेंत पाठविण्याचीं फार घाई करूं नये. त्यानें चांगली मुलास आंठ वर्षें हाई पर्यंत दम काढावा. इतकें वय होई पर्यंत त्यांस चांगली आवरशक्ति येते. आणि तीं मोठ्या हौसेनें शिक्षका शिवाय आपोआपच पुष्कळ गोष्टी शिकतात.

आपण शाळेस जात नाहीं ह्मणून हट्ट घेऊन बसलेलीं पुष्कळ मुलें मीं पाहिलीं आहेत. त्यांना-शाळेत जा ह्मटलें, कीं भारीं वाईट वाटे. त्यांची उचला तांगडी करून मोठ्या जुलमानें त्यास शाळेंत नेत असतात व तीं गुरा प्रमाणें ओरडत असतात.

अशा वेळीं त्या मास्तरालाच मुलें खूष राखून शिकविण्याची कला येत नाहीं असें समजलें पाहिजे-आणि त्या कारितां बापानें मग मुलास दुसरी चांगली शाळा शोधून काढून चांगल्या योग्य मास्तरच्या हाताखालीं दिलें पाहिजे.

मुला कडून प्रथमतः स्वदेशीय शाळेंत अभ्यास करवावा. तेथचा अभ्यास चांगला झाला, ह्मणजे त्यास इंग्रजी शाळेंत घालावें. इंग्रजी अभ्यास करूं लागण्या पूर्वीं, लेखन, वाचन, आणि गणीत उत्तम शिकवावें.

**मुलास शिकण्याच्या भाषा**— मुलानें प्रथम सर्वा आधीं आपल्या आई बापाची भाषा शिकली पाहिजे, कारण ती अतिशय सोपी असून अतिशय उपयोगी असते. एकदांच अनेक भाषा शिकावयास लावून मुलास घोटाळ्यांत घालूंनये. आपली जन्म भाषा चांगली येऊं लागली, ह्मणजे मग देश भाषा शिकवावी.

प्रथमतः त्याला घरांतल्याच पदार्थांचीं नांवें शिकूं-द्यावें. त्यानंतर आपल्या आळींत दिसणाऱ्या पदार्थांचीं नांवें शिकवावींत. हें झाल्या नंतर नेहेमीं पाहण्यांत येणाऱ्या जनावरांचीं नांवें शिकवावींत.

शिकण्याचें तत्त्व हें, कीं प्रथम सोपी माहिती करून द्यावी, मग मोठमोठ्यांत विषयांत मन घालण्यास लावावें. सोप्या विषयांत प्रारंभ करावा, आणि हळू-हळू गहन विषयांत शिरावें. उदाहरण, मुलानें घोड्याची माहिती प्रथम करून घ्यावी, जीन किंवा, खोगिर वगैरेची नंतर. कांहीं महत्वाकांक्षी बाप असतात ते मुलास नांवें सांगावयाचीं तीं प्रथ

इंग्रजीं सांगतात. हें गैर आहे; कारण हें वर सांगितलेल्या तत्वाच्या अगदीं उलट आहे. एकाच कालीं मुलाचें लक्ष दोन भाषे कडे लावल्या सारखें होतें.

तेव्हां मुलास अल्पवयांत संस्कृत शब्द सांगत बसणें हा मूर्खपणा, हें मला निराळें सांगण्याची आतां गरजच राहिली नाहीं.

कारण उघडच आहे कीं, घोडा शब्द हा अनेक भाषेंत मुलास सांगितला तर तो घोत्याळ्यांत पडेल. त्या पेक्षां तो शब्द एकाच भाषेंत सांगितला तर उत्तम समजेल.

**तोंडपाठ म्हणणें** — मुलास पोपटी ज्ञान कधीं शिकवूंनये. कारण ती एक फक्त ध्यानांत ठेवण्याचा मार्ग आहे. त्यानें बुद्धि किंवा ज्ञान वाढत नाहीं.

तोंडपाठ करण्याचा झपाटा गांवठी शाळेंत फार चालतो. फार निरुपयोगी असल्या शिवाय पाठाशक्तीस ही दोष देतां येत नाहीं. ज्याज्या गोष्टी थोर पणांत अवश्य तोंडपाठ असल्या पाहिजेत, त्या मुलाकडून जरूर तोंडपाठ करवाव्यात. पाढें, गुणाकार, भागाकार वगैरे ज्या हिशोबाच्या मोडण्या गांवठीं शाळेंतील मुलें बिनचुक आणि पटापट सांगतात, ती आमच्या लोकांतील पाठ करविण्याची पद्धत मला फार पसंत

आहे. ही हिशेब शिकविण्याची गांवठी शाळेंतील पद्धत इंग्रजी शाळेंतील पद्धती पेक्षां पुष्कळ चांगली असें मला दिसून आलें आहे.

तसेंच किती एक तोंड पाठ केलेल्या गोष्टी थोरपणांत फार उपयोगी पडतात. उदाहरणार्थ—

वारांचीं नांवें.

महिने.

संवत्सर.

राशी.

मुलाला शाळेंत पाठविलें असतां बापानें कोणत्या गोष्टीची काळजी ठेवली पाहिजे—

**प्रथम**— आपल्या मुलाची प्रकृती चांगली राहून त्यास दीर्घायुष्य व्हावें अशा बद्दल फार काळजी ठेवली पाहिजे.

**दुसरें**— आपल्या मुलाची उपजीविकेस समर्थ होईल अशी तजवीज करणें. जो बाप पहिल्या गोष्टीकडे ह्मणजे आरोग्याकडे दुर्लक्ष करतो तो आपणास व मुलास दोघांस ही दुःखास पात्र करून घेतो. जो बाप दुसऱ्या गोष्टीकडे दुर्लक्ष करून मुलास उपासमार करावयास लावतो तो महत्पातकी होय.

आपल्यांतील बाप पहिल्या गोष्टीकडे लक्षदेतांना खालीं लिहिल्या प्रमाणें चुक्याकरतो.

त्याच्या वाढीच्या दिवसांतच त्याच्या खाण्या पिण्याची आबाळ करून त्यास अतिशय लगामी धरतो.

नवरा बायकोस अकाळीं संग करण्यास परवानगी देतो. शाळेंतील परिक्षा लौकर पास व्हावी म्हणून मुलाच्या पाठीमागें लकडा लावून व त्यावर अभ्यासाचा भारा लादून त्याचा मेंदू झिजवितो.

**दुसऱ्या गोष्टीकडे बाप दुर्लक्ष करून खालीं लिहिल्या प्रमाणें चुका करतो—**

अविचारानें सर्व संपत्तीची धूळधाण करून आप त्यास कर्ज करून घेतो, आणि आपल्या मुलास कांहीं ठेवीत नाहीं. मुलाची उपजीविका ज्यांत होईल असा एक ही धंदा त्यास शिकवित नाहीं.

फार तर काय, आपला धंदा, जो त्यासच उत्तम शिकवितां येईल, व सहजी होईल, तो सुद्धां मुलास शिकविण्याचें त्यास सुचत नाहीं. आणि तो त्यास ढडंगा सोडून देतो.

किंवा विद्या शिकविणें ती इतकी फाजील शिकवितो, कीं मुलगा स्वतःच्या धंद्यांत निरुपयोगी होतो आणि दुसऱ्यांत शिरायला येत नाहीं. किंवा कोणत्या ही धंद्यांत उपयोगीं पडूनये अशी निरूपयोगी विद्या शिकावयास लावतो.

केव्हां केव्हां मलाला सर्व कांहीं समजतें, आणि

निर्वाह पुरती एक ही गोष्ट करावयाला येत नाहीं. ह्मणजे 'एक धड आणि भारभर चिंध्या' अशी अवस्था होते.

एकादे वेळ बाप मोठ्या आशेनें एका मोठ्या धंद्याचें ओझें मुलाच्या गळ्यांत घालतो. आणि तें काम त्यांस जिवाच्या बाहेरचें असल्या मुळें त्यास यश मिळणें कठीण पडतें. किंवा स्वतःचीच त्याची तितकी हुषारी नसते. किंवा आपण खर्चाचा अदमास केला होता, त्याच्या बाहेरचें हें काम आहे, तें आतां झेपणें कठीण असें मनांत आणून मुलाचा विद्याभ्यास बंद करतो, किंवा ज्या विद्या चरितार्थ साधनांत कधींच उपयोगी पडावयाच्या नाहींत तसल्या विद्येच्या अभ्यासांत वेळ खर्च करावयास लावतो.

उदारण—

मृतभाषा.
परदेशीय भाषा आणि कविता.
अध्यात्म विद्या.
ज्योतिष शास्त्र.
भूगर्भ शास्त्र.
प्राचीन ततिहास.
गहन गणीत.
आणि वक्तृत्व.

तर्कशास्त्र.
अर्थ शास्त्र.
राजकीय विषय.

मोठे विद्वान होऊन आपली उपजीविका चालविण्यास असमर्थ असलेल्या पेक्षां साधारणच शिकलेले परंतु जे चरितार्थ चालविण्यास लौकर समर्थ होतील अशा मनुष्यांची हिंदुस्थाला फार आवश्यकता आहे.

त्याला खाऊन फडशा पाडणारां पेक्षां उत्पन्नकणाराची फार गरज आहे. त्याला विचारी मनुष्या पेक्षां मेहनती मनुष्याची अपेक्षा फार आहे.

लग्न— कसें ही झालें तरी मुलाचें लग्न सोळा वर्षेपर्यंत आणि मुलीचें लग्न दहा वर्षे पर्यंत करूंनये.

बालविवाह करणें हें मुलांस आणि आईबापास ही इतकें कांहीं अपाय कारक आहे कीं, ह्या लग्नास उपमा देण्या येवढें पातक किंवा गुन्हा मला कोठेंच दिसून येत नाहीं.

जीं आईबापें पैशाच्या लोभानें आपल्या मुलीं म्हाताऱ्याच्या गळ्यांत बांधतात, तीं मनुष्यांच्या आणि परमेश्वराच्या फारच अवकृपेस पात्र होतात.

लग्नाचा शरीर संबंध जुळवितांना फक्त जन्म पत्रिकाच पाहून जुळवूंनये. तर त्यांत सारासार विचार

करून मग ठरवावें.

आपल्या जवळ खर्च करण्याला पैसा असला, तर लग्न समारंभाला उडवून टाकण्या पेक्षां तो जतन करून मुलाला पुढें उपयोगी पडण्या साठीं दिलेला उत्तम.

**उपसंहार**—वर सांगितलेल्या हकीगतींत विद्वत्ता, न्यायशास्त्र, तर्कशास्त्र, इत्यादि गुणांकडे लक्ष दिलेलें नाहीं.

हीं वर दर्शविलेलीं तत्वें माझ्या समजुतीनें निर्दोष आहेत.

आणि ह्या केलेल्या सूचना उपयोगी पडतील अशी आहे.

ह्याच विचारांची ठिकठिकाणीं चर्चा केली, तर कांहीं त्यापासून तोटा नाहीं.

आमच्यांतील सर्व बापांस आपलीं मुलें थोर कशीं करावींत हें समजावें, अशी माझी अंतःकरण पूर्वक इच्छा आहे.

समाप्त.